म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक

सन

लय क्रमांक

पुस्तकाचें नांव

Zhi · 69

# गुलछबु

अथवा

## जादूविद्येचें अपूर्व दिग्दर्शन.

ही कादंबरी

**वामन पांडुरंग भावे**

यांनीं रचिली ती

**विठ्ठल सखाजी मुरकर**

यांनीं

मुंबईत

'दीनवत्सल' छापखान्यांत छापविली.

सन १८९३.

किंमत १२ आणे.

हें पुस्तक रजिस्टर करून सर्व प्रकारचे हक्क विठ्ठल संभाजी मूरकर यांनीं आपले स्वाधीन ठेवले आहेत.

# प्रस्तावना.

मनुष्यांस निर्वाह करण्याकरितां अनेक प्रकारचे कष्ट व व्यवसाय करावे लागतात. तेणेंकरून त्यांचें मन केंव्हां केंव्हां उदास होऊन एखादें मानसिक अथवा शारीरिक श्रम सोसण्यास अगदीं नालायक होतें. अशा वेळीं त्यांचे हातून चांगल्या रीतीनें व आनंदानें श्रम होण्यास मध्यें मध्यें त्यांचे मनाला कांहीं मनोरंजक अथवा चमत्कारिक करमणुकीचे प्रकार मिळाले पाहिजेत. तालीम, आट्यापाट्या, कसरत वगैरे खेळ जसे शारिरीक करमणुकीला हितावह आहेत तसेंच अनेक प्रकारचे सुरस, चमत्कारिक, कल्पित इत्यादि ग्रंथ वाचल्यापासून मानसिक शिथिलता जाऊन चांगलें मनरंजन होतें. आतां कोणी ह्मणेल कीं, कादंबऱ्या चमत्कारिक खऱ्या, परंतु कल्पित व खोट्या अशा असल्या, तर त्या वाचल्यापासून काय फायदा होतो? तर तशा प्रकारच्या कादंबऱ्या वाचल्यापासून मनुष्यास उत्तम करमणूक होऊन प्रसंगविशेषीं एखादें संकट येऊन पडल्यासही तें सहन करण्यास त्याला धैर्य प्राप्त होतें. अस्तु.

हातीमताई, बागोबहर, गुलसनोबर, गुलबकावली इत्यादि

नामांकित कथाग्रंथांप्रमाणेंच उर्दू भाषेंत 'फसाना अजायब' ( अपूर्व कथा ) हा एक कथाग्रंथ आहे. ही गोष्ट फारच सुरस, अत्यंत आश्चर्यकारक आणि अति मनोवेधक असून तींत जागजागीं जादूविद्येच्या अति अद्भुत व विलक्षण चमत्कारांचें दिग्दर्शन केलें असल्यामुळें ही कादंबरी वाचतांना मन अगदीं तल्लीन होऊन जातें. या कादंबरीचा लाभ महाराष्ट्र वाचकांस व्हावा सबब हल्लीं आम्हीं वरील अपूर्व ग्रंथाचें मराठी भाषांतर 'गुलछबु' नामक कादंबरीरूपानें प्रसिद्ध केलें आहे; तरी ही कादंबरी महाराष्ट्र वाचकांचें मनरंजन करण्यास उपयोगीं पडेल अशी आशा आहे.

पुस्तक कर्त्ता.

८१

[library stamp]

# गुलहुसु

अथवा

## जादूविद्येचें अपूर्व दिग्दर्शन.

प्राचीनकाळीं खुतन या नांवाचें एक मोठें धनाढ्य शहर होतें. त्या शहरांतील सर्व रहिवाशी मोठे प्रतिष्ठित व सर्व प्रकारच्या विद्येंत निपुण होते. तेथील हवापाणी शरीरसुखास अनुकूल असल्यामुळें सर्व लोक सदृढ व नेहमीं आनंदयुक्त असत. त्या शहरीं फिरोजबख्श या नांवाचा नीतिमान् व स्वधर्मपरायण राजा राज्य करीत होता. प्रजेचें पुत्रवत् पालन करणें हेंच तो आपलें मुख्य कर्त्तव्यकर्म आहे असें समजत असे. त्यामुळें त्याच्या अमलाखालील सर्व प्रजा राजाचें अभिष्ट चिंतण्यांत नेहमीं तत्पर असे. त्याच्या राज्यांत चोरीमारी इत्यादि उपाधि नसल्यामुळें सर्व प्रजा आनंदानें वागत असे. त्या कारणानें राजासही आपला कारभार सुखानें चालविण्यास सांपडत असे. प्रजेच्या

संतोष हेंच आपलें सुख असें मानणारा तो सुविचारी फिरोजबख्श राजा जरी मोठ्या आनंदानें आपलें कर्तव्यकर्म बजावीत असे, तरी पोटीं पुत्रसंतान नसल्यामुळें त्याचें मन सदां उदास असे. पुत्रप्राप्तीकरितां त्यानें अनेक स्त्रियाही वरिल्या; इतकेंच नव्हे तर पुत्रसुख प्राप्त होणें हें केवळ ईश्वरेच्छेवर अवलंबून आहे असें तो समजत असल्यामुळें परमेश्वराच्या संतुष्टतेकारितां त्यानें बराच दानधर्मही चालू ठेविला होता; परंतु ती त्याची इच्छा बरेच दिवसपर्यंत अतृप्तच राहिली.

या गोष्टीस बरेच दिवस लोटल्यावर फिरोजबख्शाच्या वयाला जेव्हां साठावें वर्ष लागलें, तेव्हां परमेश्वराच्या कृपेनें त्याची सद्गुणवर्तिनी राणी गरोदर राहिली. त्या वेळीं बादशाहास जो आनंद झाला त्याचें वर्णन करणेंही अशक्य होय. शुक्लपक्षीय चंद्राप्रमाणें तो गर्भ वाढत वाढत जेव्हां नऊ महिने पूर्ण झाले, तेव्हां बालसूर्याप्रमाणें तेजस्वी असा पुत्र झाला. त्या वेळीं फिरोजबख्शानें बंदिखान्यांतील सर्व बंदिवान मुक्त केले, प्रजेचा कर माफ केला व सर्व नगर शृंगारून घरोघरीं मोठे उत्सव सुरू केले. नंतर पुत्राचें जातकर्म वगैरे विधि करून त्यानें त्याचें

जानआलम् असें नांव ठेविलें. व त्याच वेळीं पुत्राच्या नांवानें एका नव्या शहराची वसाहत त्यानें करविली. इतका प्रकार झाल्यावर फिरोजबख्श राजानें कित्येक नामांकित ज्योतिषी बोलावून त्यांस आपल्या पुत्राची पत्रिका तयार करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें ज्योतिषांनीं जन्मपत्रिका तयार करून राजास सांगितलें कीं, तुझ्या पुत्रास उत्तम प्रकारचें चंद्रबळ असल्यामुळें हा मोठा शूर पुरुष होऊन परमेश्वर-कृपेनें लवकरच राज्यपदारूढ होऊन सर्व प्रजेस यथान्याय वागवून लोकप्रीति संपादन करील. तसेंच ह्याच्या वयाला पंधरावें वर्ष लागतांच गुरु द्वादश-स्थानीं, व शनी पंचमस्थानीं येईल, त्या वेळीं एक उत्तम पोपट यास प्राप्त होईल; आणि त्याच्यामुळें हा राज्य-पदाचा त्याग करून अनेक देश पर्यटन करील व महत् संकटांत सांपडेल. नंतर एका सिद्धाच्या साह्यानें त्यांतूनही त्याची सुटका होऊन एक सुंदर व पतिव्रता स्त्री यास प्राप्त होईल. त्या स्त्रिचा बाप मोठा जादू-गार असून तो राजपुत्राची सर्व संकटांतून मुक्तता करील. नंतर राजपुत्र आपल्या शहरास येऊन आईबापांस भेटून निरंतर राज्यकारभार चालवील; व प्रजेच्या संतोषानें

संतोष हेंच आपलें सुख असें मानणारा तो सुविचारी फिरोजबख्श राजा जरी मोठ्या आनंदानें आपलें कर्तव्यकर्म बजावीत असे, तरी पोटीं पुत्रसंतान नसल्यामुळें त्याचें मन सदां उदास असे. पुत्रप्राप्तीकरितां त्यानें अनेक स्त्रियाही वरिल्या; इतकेंच नव्हे तर पुत्रसुख प्राप्त होणें हें केवळ ईश्वरेच्छेवर अवलंबून आहे असें तो समजत असल्यामुळें परमेश्वराच्या संतुष्टतेकरितां त्यानें बराच दानधर्मही चालू ठेविला होता; परंतु ती त्याची इच्छा बरेच दिवसपर्यंत अतृप्तच राहिली.

या गोष्टीस बरेच दिवस लोटल्यावर फिरोजबख्शाच्या वयाला जेव्हां साठावें वर्ष लागलें, तेव्हां परमेश्वराच्या कृपेनें त्याची सद्गुणवर्तिनी राणी गरोदर राहिली. त्या वेळीं बादशाहास जो आनंद झाला त्याचें वर्णन करणेंही अशक्य होय. शुक्लपक्षीय चंद्राप्रमाणें तो गर्भ वाढत वाढत जेव्हां नऊ महिने पूर्ण झाले, तेव्हां बालसूर्याप्रमाणें तेजस्वी असा पुत्र झाला. त्या वेळीं फिरोजबख्शानें बंदिखान्यांतील सर्व बंदिवान मुक्त केले, प्रजेचा कर माफ केला व सर्व नगर शृंगारून घरोघरीं मोठे उत्सव सुरू केले. नंतर पुत्राचें जातकर्म वगैरे विधि करून त्यानें त्याचें

जानआलम असें नांव ठेविलें. व त्याच वेळीं पुत्राच्या नांवानें एका नव्या शहराची वसाहत त्यानें करविली. इतका प्रकार झाल्यावर फिरोजबख्श राजानें कित्येक नामांकित ज्योतिषी बोलावून त्यांस आपल्या पुत्राची पत्रिका तयार करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें ज्योतिषांनीं जन्मपत्रिका तयार करून राजास सांगितलें कीं, तुझ्या पुत्रास उत्तम प्रकारचें चंद्रबल असल्यामुळें हा मोठा शूर पुरुष होऊन परमेश्वर-कृपेनें लवकरच राज्यपदारूढ होऊन सर्व प्रजेस यथान्याय वागवून लोकप्रीति संपादन करील. तसेंच ह्याच्या वयाला पंधरावें वर्ष लागतांच गुरु द्वादश-स्थानीं, व शनी पंचमस्थानीं येईल, त्या वेळीं एक उत्तम पोपट यास प्राप्त होईल; आणि त्याच्यामुळें हा राज्य-पदाचा त्याग करून अनेक देश पर्यटन करील व महत् संकटांत सांपडेल. नंतर एका सिद्धाच्या साह्यानें त्यांतूनही त्याची सुटका होऊन एक सुंदर व पतिव्रता स्त्री यास प्राप्त होईल. त्या स्त्रिचा बाप मोठा जादू-गार असून तो राजपुत्राची सर्व संकटांतून मुक्तता करील. नंतर राजपुत्र आपल्या शहरास येऊन आईबापांस भेटून पूर्ववत राज्यकारभार चालवील; व प्रजेच्या संतोषानें

आणि महत् पुण्याईनें परमेश्वरकृपा संपादन करील. हें ज्योतिषांनीं सांगितलेलें भविष्य ऐकून फिरोजबख्श मनांत अतिशय दिलगीर झाला. परंतु परमेश्वराच्याच इच्छेनें सर्व गोष्टी घडतात असा विचार करून त्यानें त्या ज्योतिषांस बरेंच द्रव्य व कित्येक गांव इनाम देऊन संतोषविलें.

इकडे जानआलम राजपुत्र शुक्लपक्षाच्या चंद्राप्रमाणें दिवसेंदिवस वृद्धिंगत होत होत जेव्हां सहा वर्षांच्या वयाचा झाला तेव्हां फिरोजबख्श राजानें त्यास निरनिराळ्या विद्या शिकविण्याकरितां अनेक गुरूंच्या स्वाधीन केलें. ज्याचें आयुष्य पुढें अनेक प्रकारच्या उलाढाली करण्यांत जावयाचें आहे असा तो परमेश्वर कृपावंत राजपुत्र उपजतांच मोठा बुद्धिवान असल्यामुळें थोडक्याच दिवसांत सर्व प्रकारच्या विद्येंत मोठा हुषार झाला; हें पाहून स्वतः फिरोजबख्शासही मोठें समाधान वाटलें. राजपुत्र जानआलम बारा वर्षांच्या वयाचा होतांच फिरोजबख्शानें आपला वृद्धापकाळ झाला असें पाहून आपल्या कुलशीलास योग्य अशा एका राजाची सुस्वरूप मुलगी पाहून जानआलमचें लग्न केलें. तेव्हां मदनासारखा सौंदर्यवान राज-

पुत्र व जिच्या लावण्याची बरोबरी करणारी स्त्री सर्व जगांत क्वचितच सांपडेल अशी चंद्रवदना लावण्यलतिका त्याची स्त्री असें हें मदनरतीचें जोडपें पाहून सर्वांस मोठी धन्यता वाटली.

---

## प्रकरण २ रें.

---

नित्यशः संध्याकाळच्या वेळीं सर्व शहरभर फिरण्याचा जानआलम राजपुत्राचा नियम असल्यामुळें एके दिवशीं तो शहरच्या मुख्य बाजारांत सहल करीत असतां एक सत्तर ऐंशीं वर्षांचा वृद्ध मनुष्य हातांत एक पोपटाचा पिंजरा घेतलेला त्याच्या नजरेस पडला. हा पोपट दिसण्यांत मोठा उमदा असल्यामुळें राजपुत्राची नजर जातांच त्याजला मोह उत्पन्न होऊन तो पोपटाकडे पहात कांहीं वेळ स्वस्थ उभा राहिला. हें पाहून पोपट त्या वृद्ध मनुष्यास ह्मणाला:—ह्या राजपुत्राच्या मनांत माझ्याविषयीं प्रेम उत्पन्न झालें आहे. तथापि मी यःकश्चित् पक्षी असल्यामुळें माझी किंमत जरी फारशी नाहीं तरी हा जर मला विकत घेईल तर तुझें

कल्याण होईल. हें पोपटाचें भाषण ऐकतांच राजपुत्र त्या वृद्ध मनुष्यास ह्मणाला, ह्या पोपटाची किंमत काय तें सांग ? हें ऐकून पोपट ह्मणाला, गरिबाच्या वस्तूची किंमत करणारा एका परमेश्वरावांचून दुसरा कोणीच नाहीं. हें त्या पोपटाचें धूर्ततेचें भाषण ऐकतांच राजपुत्रानें एक लक्ष मोहोरा व उत्तम शिरपाव त्या वृद्धास बक्षीस दिला. नंतर तो पोपटाचा पिंजरा घेऊन राजपुत्र आपल्या महालीं आला आणि स्त्रीस पोपट दाखवून त्याचे अलौकिक गुण वर्णन करूं लागला. हा पोपट नित्यशः चमत्कारिक गोष्टी सांगून राजपुत्राचें व त्याच्या स्त्रिचें मन रमवीत असल्यामुळें उभयतांचीही त्याजवर अतिशय प्रीति जडली होती. फार तर काय परंतु राजपुत्र एक क्षणभरही त्यास विसंबत नसे. मात्र राजदरबारीं जातेवेळीं तो पिंजरा राणीच्या ताब्यांत असे.

एके दिवशीं राजपुत्र नित्याप्रमाणें दरबारांत गेला होता व राणी मंगलस्नान करून उंची वस्त्रें व रत्नजडीत अलंकार परिधान करून आपलें दिव्य रूप आरशांत पहात बसली होती. त्या वेळीं परमेश्वरानें दिलेल्या अलौकिक सौंदर्याचा गर्व होऊन ती आपल्या प्रत्येक दासीस “ मी कशी दिसत्यें ? ” असें विचारूं

वृत्तांत निवेदन केला; तेव्हां प्रधानपुत्रही त्याजबरोबर येण्यास सिद्ध झाला. हें पाहून राजपुत्रानें दोन चलाख घोडे व बरेंच अमोलिक जवाहीर बरोबर घेतलें आणि प्रभातकाळ केव्हां होतो याची चातकाप्रमाणें वाट पहात राहिला. पुढें मोठ्या संकटानें रात्र सरून अरुणोदयाचा समय येतांच राजपुत्र व प्रधानपुत्र कोणास न विचारतां प्रिय पोपटास बरोबर घेऊन घोड्यावर स्वार होऊन गुलछत्रूच्या प्राप्तीकरितां निघाले.

---

## प्रकरण ३ रें.

---

राजपुत्र जानआलम व प्रधानपुत्र प्रिय पोपटासह खुतन शहरच्या बाह्यप्रदेशीं आल्यावर राजपुत्रानें मागें वळून नगराकडे पाहिलें. त्या वेळीं त्याचे नेत्रांतून दुःखाश्रू वाहूं लागले. कारण ज्यानें यावज्जन्मपर्यंतचा काळ ज्या ठिकाणांत घालविला तें ठिकाण सोडून जाणें त्याच्या जिवावर येईल यांत फारसें नवल नाहीं. तशांतून जो हेतू साध्य करण्याकरितां स्वनगराचा त्याग करावयाचा तो हेतू अनायासानें साध्य होण्यासारखा

नव्हता. असो. राजपुत्रानें स्वनगराकडे पाहून दीर्घ श्वास टाकल्यावर आपल्या प्रिय पोपटास पिंजऱ्यांतून बाहेर काढून सोडून दिलें. नंतर राजपुत्र व प्रधानपुत्र घोड्यावर व पोपट स्वगतीनें मजल दरमजल प्रवास करूं लागले. अशा रीतीनें जातां जातां कित्येक दिवसांनीं त्यांस एक सुंदर अरण्य लागलें. त्यांतील वृक्ष सदासर्वकाळ फळाफुलांनीं सुशोभित असत. मधून मधून येणाऱ्या वाऱ्याच्या मंद झुळुकीनें ह्या तिघांस मोठी हुशारी व आनंद वाटत असे. अशा रीतीनें त्या अरण्यांतून त्यांचा प्रवास चालला असतां एके दिवशीं भरदोनप्रहरीं पवनगतीनें पळणारे असे दोन हरीण राजपुत्र व प्रधानपुत्र यांच्या जवळ आले. त्यांच्या अंगावर मखमालीच्या झुली घातल्या होत्या व पायांत सुस्वर आवाज करणारे घुंगुर बांधले होते. हरिणांस पाहतांच राजपुत्राच्या व प्रधानपुत्राच्या मनांत त्या दोघांस पकडावें असें येऊन त्यांनीं आपले घोडे सोडले. त्या वेळीं पोपट मोठा किलबिलाट करून राजपुत्रास म्हणाला, महाराज, हें आपण काय करतां ? हे जे आपणांस हरीण दिसताहेत तो सर्व जादूचा प्रकार असून त्यांस पकडण्याची इच्छा केली असतां मोठा अनर्थ

होईल. असें जरी त्या पोपटानें सांगितलें, तरी राजपुत्रानें व प्रधानपुत्रानें तें त्याचें म्हणणें न ऐकतां त्यांचा पाठलाग करण्याचा क्रम चालूच ठेवला. शेवटीं आपलें बोलणें राजपुत्र ऐकत नाहीं असें पाहून पोपट दुःख करीत एका वृक्षावर बसला.

इकडे राजपुत्र व प्रधानपुत्र हरीणांच्या मागें लागत सुमारें चार पांच कोस जमीन चालून गेले असतां, ते मायावी हरीण एक एका रस्त्यानें व दुसरा दुसऱ्या रस्त्यानें निघून गेले. तेव्हां एकाच्या मागें राजपुत्र व दुसऱ्याच्या मागें प्रधानपुत्र लागला. अशा रीतीनें संध्याकाळपर्यंत जातां जातां अकस्मात तो हरीण गुप्त झाला व जानआलम एकटाच त्या अरण्यांत भटकूं लागला. नंतर त्याच्या दृष्टीस एक स्वच्छ पाण्याचा झरा पडल्यावरून तो तेथें गेला आणि हातपाय धुवून परमेश्वराची प्रार्थना करून ह्मणूं लागला कीं, हे विश्वंभरा, ह्यावेळीं माझें रक्षण करणारा तुझ्या शिवाय दुसरा कोणीच नाहीं. कारण, तुमतें बोलण्यालासुद्धां येथें कोणी मनुष्य नाहीं; मग मी आपलें सुखदुःख कोणाजवळ सांगूं? अशा रीतीनें विलाप करीत तो बसला आहे इतक्यांत एक वृद्ध मनुष्य त्या ठिकाणीं

आला आणि तुझी काय इच्छा आहे असें राजपुत्रास विचारूं लागला. त्या वेळीं जानआलम मोठा आनंदित होऊन ह्मणाला, माझी इच्छा पूर्ण करण्याचा जर आपला हेतू असेल तर अति जलदीनें मला जिरनिगार शहरांत पोंचवा. हें ऐकून तो वृद्ध ह्मणाला, येथून तुझी सुटका होणें दुरापस्त आहे. कारण, हें सर्व अरण्य जादूच्या योगानें निर्माण केलेलें असल्यामुळें एक वेळ येथें आलेला मनुष्य पुन्हां परत जात नाहीं. हें त्या वृद्धाचें भाषण ऐकून जानआलम ह्मणाला, तर मग अशा अवस्थेंत विरहव्यथेचें दुःख भोगीत बसण्यापेक्षां मृत्यूच्या जाभाड्यांत सांपडलेलें फार चांगलें असें मला वाटतें. जानआलमचें हें भाषण ऐकून वृद्धास त्याची दया येऊन तो ह्मणाला, हे राजपुत्रा, असा कां घाबरतोस? ईश्वर प्रत्येक मनुष्यास संकटमुक्त करण्यास महासमर्थ आहे. त्यावर राजपुत्र ह्मणाला, एक वेळ मी जिच्यावर आसक्त झालों आहे तिचा मुखचंद्र पहावा अशी इच्छा आहे. कारण या संकटांतून मुक्त होण्याचा भरवंसा नसल्यामुळें इच्छा अतृप्त ठेवणें बरें नाहीं. त्यावर वृद्ध ह्मणाला, तूं आपले डोळे झांक ह्मणजे तुझी इच्छा पूर्ण होईल. वृद्धाच्या सांगण्याप्रमाणें

राजपुत्रानें आपले डोळे झांकले त्या[illegible]मार शहरची अलौकिक शोभा व जिच्या इच्छेनें तो इतक्या संकटांत पडला ती गुलछबु त्याच्या नजरेस पडली. तेव्हां गुलछबूचें पोपटानें सांगितल्याप्रमाणें अति सुंदर रूप पाहून जानआलम मोठा आक्रोश करूं लागला. हें पाहून वृद्धानें त्याची समजूत करून त्यास थोडें खाव-यास देऊन व तेथेंच निद्रा करावयास सांगून तो वृद्ध गुप्त झाला. पुढें जसजशी रात्र पडत चालली, तस-तसा राजपुत्राचा विरहाग्नि जास्तच भडकूं लागून चाल-ण्याचे जरी अतिशय श्रम झाले होते तरी बिलकूल झोंप येईना. आपली प्रियपात्र गुलछबु कशी प्राप्त होईल या संबंधाचे एकसारखे त्याचे विचार चालले होते. शेवटीं अशा विवंचनेंत रात्र सरून अरुणोदय झाल्यावर जानआलम मार्ग क्रमूं लागला. परंतु प्रधानपुत्राची व पोपटाची अवस्था काय झाली असेल याची त्यास आठवणही झाली नाहीं.

जानआलम दरकुच दरमजल प्रवास करीत असतां एके दिवशीं इतकें प्रखर ऊन पडलें कीं, त्या योगानें वृक्षाचीं पानें करपून जाऊन दगड विस्तवासारखे लाल झाले. पशु पक्षी तान्हेनें व्याकुळ होऊन भडाभड

प्राणत्याग करूं लागले. हरिणांच्या पाटी काळ्या पडल्या. पाणी इतकें तापलें कीं आंतील मासे भाजून मेले. अशा वेळीं राजपुत्राचे प्राणही तान्हेनें कासाविस झाले. इतक्यांत एका वृक्षाच्या तळाशीं स्वच्छ पाण्याची लहानशी तळी त्याच्या नजरेस पडल्यावरून मोठ्या उत्कंठेनें तो तेथें गेला आणि पाणी पिण्याच्या इच्छेनें आंत पाहूं लागला, तों जिच्या प्राप्तीकरतां हा दुःखद प्रवास राजपुत्रास भोगावा लागला त्या गुलछबूचें रूप पाण्यांत दिसूं लागलें. हें पाहून जानआलम अगदीं चकित झाला. इतक्यांत आंतून ध्वनि निघाला कीं, हे राजपुत्रा, इतका वेळ तूं कोठें होतास? मी केवढा वेळ एक सारखी तुझी वाट पहात आहे; चल लवकर ये. हे शब्द ऐकतांच कांहीं एक विचार न करितां डोळे मिटून राजपुत्रानें त्या तळींत उडी टाकली. तेव्हां डोकें खालीं व पाय वरती होऊन तो तळाशीं गेला. नंतर जानआलमनें डोळे उघडून पाहिलें तों एक मोठें घोर अरण्य त्याच्या नजरेस पडलें. तेव्हां हा काय चमत्कार आहे याबद्दल त्यास मोठें आश्चर्य वाटलें व पोपटानें सांगितलेलें न ऐकल्यामुळें हें संकट उद्भवलें असें वाटून तो दुःख करूं लागला. रोपटीं होणाऱ्या

गोष्टींपुढें इलाज नाहीं असा विचार करून तो पुढें जाऊं लागला असतां एक रमणीय बगीचा त्याचे नज-रेस पडला. त्या बागेंत स्वच्छ पाण्याचे पाट चहूंकडे वहात होते, अनेक प्रकारचे पक्षी वृक्षांवर बसून आप-ल्या मधुर रवानें आसमंतांतील प्रदेश ध्वनित करीत होते, व पुष्कळ रूपवती स्त्रिया इकडून तिकडे फिरत होत्या. अशी ती रमणीय उपवन शोभा पहात पहात जानआलम चालला असतां अनेक प्रकारचे रंगीबेरंगी दगडी चबुतरे त्याच्या नजरेस पडले. त्यांतील एका संगमरवरी चबुतऱ्यावर मखमाली परांच्या गाद्या आं-थरल्या असून इंद्राच्या अप्सरांस आपल्या अलौकिक सौंदर्यानें लाज्जित करणारी अशी एक षोडशवार्षिकी रूपवती स्त्री बसली असून अनेक सुंदर स्त्रिया तिची सेवा करण्याकरितां अगदीं तत्पर होत्या. राजपुत्र जानआलम चकित होऊन ती अवर्णनीय शोभा पहात चालला असतां एक दासी म्हणाली—हे अनोळखी पुरुषा, कोठें चाललास? राजपुत्र जिवावर उदार झाला असल्यामुळें तिच्या प्रश्नाचें उत्तर न देतां बेधडक ज्या मखमाली आसनावर ती रूपवती स्त्री बसली होती तेथें

जाऊन बसला आणि आश्चर्ययुक्त मुद्रेनें चहूंकडे पाहूं लागला. नंतर सभोंवतालच्या वृक्षांवर पशुपक्ष्यांच्या आकृतीचीं लटकलेलीं फळें, व आपआपसांत गोष्टी बोलत असलेलीं पुष्पें पाहून त्यास मोठा अचंबा वाटला. इतक्यांत मुख्य स्त्रिनें "आपण कोठून आलां" असें विचारलें. तें ऐकून राजपुत्र ह्मणाला, मी कोठून आलों हें तूं जाणत असतां व्यर्थ मला विचारण्यांत काय अर्थ! जानआलमचें हें भाषण ऐकून त्या सुंदर स्त्रिनें एका दासीकडून उत्तम प्रकारचें उंची मद्य आणविलें आणि एक रत्नजडित पेला भरून राजपुत्राच्या हातीं दिला. तेव्हां त्यानें आपल्या मनाशीं विचार केला कीं, हें मद्य जर न प्यावें तर ही जादुगार स्त्री काय संकट उत्पन्न करील कोण जाणें! वरं प्यावें तर यापासून परिणाम काय होईल हेंही कळत नाहीं. असा तो बराच वेळ विचार करीत असतां जें होणें असेल तें होईल अशा हेतूनें त्यानें तो प्याला गट्ट केला. नंतर त्या स्त्रिनेंही तें सर्व मद्य प्राशन केलें. पुढें थोडक्याच वेळानें मदिरापानानें उन्मत्त होऊन ती स्त्री जानआलमबरोबर दांडगाई करूं लागली. तें पाहून राजपुत्रही भीतीच्या योगानें तिची ती मस्तलीला मुकाट्यानें सहन करून घेऊं लागला.

अशा तऱ्हेनें मध्यरात्र झाल्यावर एका दासीनें पंच पक्वान्नांनीं भरलेलीं दोन ताटें आणून दोघांपुढें ठेविलीं. तेव्हां जानआलमनें क्षुधा शांत्यर्थ थोडासा उपहार केला व त्या स्त्रिनें मनसोक्त भोजन केलें. नंतर राजपुत्राचा हात धरून ती स्त्री हास्य विनोदादिक लीला करीत आपल्या महालांत गेली; आणि ज्याच्यावर मश्रूच्या नरम गाद्या आंथरल्या आहेत अशा एका रत्नजडित पलंगावर जानआलमास बसवूं लागली. राजपुत्राच्या मनांत त्या ठिकाणीं बसण्याचें नसल्यामुळें तो कांकूं करूं लागला. हें पाहून ती स्त्री दुःखित अंतःकरणानें म्हणाली, हे राजपुत्रा, शहपाल या नांवाचा सर्व जादुगारांचा जो स्वामी आहे त्याची मी कन्या असून पुष्कळ दिवसापासून तुझ्या समागमाची इच्छा करीत होत्यें. इतकेंच नव्हे, तर तुझ्या विरहानें अन्नपाणीही सोडून सर्व काळ चिंतेंत निमग्न होतें. परंतु परमेश्वरकृपेनें आज तुझी माझी भेट झाली. या करितां प्रसन्नांतःकरणानें येथील सर्व सुखाचा उपभोग घे. मात्र ज्या गुलछबूवर तुझें मन गेलें आहे तिच्या प्राप्तीची इच्छा करूं नको व ती कधींही सफल होणार नाहीं.

हें ऐकून शाहाजादा प्रथम भयाभित झाला. परंतु पुन्हां मनाचा दृढ निश्चय करून ह्मणाला, हे स्त्रिये, तुझ्या बोलण्यावरून मात्र असें वाटतें कीं, तूं फक्त प्रीतीचा स्वादच जाणत आहेस. परंतु न्यायानें पहा कीं, जिच्याकारितां मीं आपलें घर सोडलें व इतकें दुःख भोगलें तिच्या प्राणाचा तूं हेवा कारितेस. यावरून मी तरी तुझा काय भरंवसा मानूं? कारण, ह्या जगामध्यें तीन प्रकारचे वैरी आहेत. ते कोणते ह्मणशील, तर एक आपला वैरी, दुसरा वैऱ्याचा मित्र व तिसरा मित्राचा वैरी हे तिघेही सारखेच होत. शिवाय ही कोणची रीत कीं, एकीचें मनांत चिंतन करीत असतां मध्येंच तिला टाकून जेथें ऐषआराम मिळेल तेथेंच वसून रहावें? मी कांहीं द्रव्याची इच्छा धरून आपलें राज्य सोडून येथें आलों नाहीं. हें ऐकून ती स्त्री लज्जित होऊन ह्मणाली, तें कांहीं असो. परंतु जर तूं माझ्या इच्छेप्रमाणें वागणार नाहींस, तर आतांच्या आतां तुझ्या प्रियकरणीस येथें आणून तुझ्या समक्ष जाळून टाकीन व मी आपली इच्छा तृप्त करून घेईन. हें ऐकून शाहाजादा यावरून आपल्याशीं विचार करूं लागला कीं, आतां जर मी हिच्या म्हणण्याप्रमाणें

वागण्याचें नाकारीन, तर खरोखरच मी आपलें व प्राण-
प्रियेचे प्राण दुःखांत घालीन; त्यापेक्षां हिच्या म्हणण्याप्र
अनुसरावें, मग ईश्वर काय करील तें खरें. असा
विचार करून तो जादूगार स्त्रीस म्हणाला, प्रिये,
एवढा वेळ फक्त तुझें माझ्या ठिकाणीं किती प्रेम आहे
हेंच पहात होतों; वास्तविक तूं मला प्राणापेक्षांही
प्रिय आहेस. कारण, असा कोण दैवहीन मनुष्य
आहे कीं, जो तुझ्यासारखी सौंदर्यवान व आपण हो-
ऊन लुब्ध झालेली स्त्री व ही दौलत सोडून उगाच
नुसत्या आशेवर वनोपवनें भटकत फिरेल ? असें ह्मणून
शहाजाद्यानें तिला दृढालिंगन दिलें.नंतर कांहीं वेळ तिच्या
मर्जीप्रमाणें भोगविलास भोगल्यावर ती जादुगार स्त्री
स्वस्थ निजली; तथापि शहाजाद्यास कांहींकेल्या झोंप
येईना. सर्व रात्रभर तो आपल्या प्रियेच्या विरहानें
शोक करीत होता.

अशा रीतीनें शेष रात्र निघून गेल्यावर जेव्हां
सूर्योदय झाला, तेव्हां जादुगार स्त्रिनें शहाजाद्यास ह-
मामखान्यांत नेलें व मंगलस्नान घालून त्याजकडून
उत्तम प्रकारचें भोजन करविलें. पुढें जेव्हां उभयतां
रंगमहालांत गेलीं तेव्हां ती जादुगार स्त्री ह्मणाली;

हे शहाजाद्या, जर तूं आज्ञा देशील तर सायंकाळ- पर्यंत मी आपल्या बापाच्या दरबारांत जाऊन येईन. शहाजाद्यास तिचा सहवास मनापासून आवडत नस ल्यामुळें जितका वेळ एकांत मिळेल तितका पाहिजेच होता. तथापि तो वरकरणी दुःख दाखवून ह्मणाला तुझ्याशिवाय एक पळही मला करमणार नाहीं, परंतु तुला जाणें जरूरच आहे तर जा; पण लवकर परत ये. हे ऐकून ती स्त्री मोठ्या आनंदानें निघून गेली. तेव्हां त्या महालांत दुसरें कोणीच नसल्यामुळें शहाजाद्यानें अनेक प्रकारें शोक करण्यास सुरवात केली. नंतर तो ह्मणाला,—माझ्यासारखा दैवहीन प्राणी या पृथ्वी वर दुसरा कोणीही नसेल. कारण, ह्या ठिकाणीं अशा तऱ्हेचें कोणीही मनुष्य नाहीं कीं मी आपलें दुःख त्याजवळ सांगेन. दैवाची किती विचित्र करणी आहे! पहा कीं, ज्याच्या संगतीनें मनांतील इच्छा तृप्त व्हाव- याची तो पोपट तर मला सोडून निघून गेला; आणि प्रधानपुत्र जो माझा पूर्ण मित्र तोही ह्या वेळीं माझ्या पासून निराळा झाला. असो, प्रारब्ध माझें! अशा प्रकारें शहाजाद्याचा शोक चालला आहे, तोंच ती जादु- गार स्त्री आपल्या बापाच्या दरबारांतून परत आली.

रमणीय असून अनेक प्रकारच्या फु[illegible] परिपूर्ण असल्यामुळें शहाजाद्यास अ[illegible] आनंद होऊन त्यानें तेथेंच रात्र घालविण्याचा विचार केला व त्या बागेंतच एका संगमरवरी चबुतऱ्यावर विश्रांति घेत स्वस्थ बसला.

ते दिवस वर्षाऋतूचे असल्यामुळें आकाश मेघाच्छादित होऊन गेलें होतें व मधून मधून विजा चमकून तुषारयुक्त मंद पर्जन्य पडत होता. तो समय संध्याकाळचा असल्यामुळें पक्षी आपल्या घरट्याकडे जाण्याच्या धांदलींत होते व निशीथसमयीं ओरडणारे जीवजंतु आपल्या सूक्ष्म स्वरानें आतां थोडक्याच वेळानें रात्र होईल हें सुचवित होते. अशा ह्या चित्तोल्हादक समयाची शोभा पाहून शहाजाद्यास समाधान वाटलें. मनुष्यास थोडा आराम वाटला म्हणजे जिवाला जी गोष्ट प्रिय तिकडे त्याचें अवधान लागावयाचें हा जो सर्व साधारण नियम, त्याप्रमाणेंच त्या वेळीं शहाजाद्याची अवस्था झाली होती. सारा दिवस एकसारखें चालण्याचे श्रम झालेले असल्यामुळें त्या रमणीय बागेंत थोडा वेळ सुखस्वाद अनुभवितांच त्यास प्रिय गुलछबूची आठवण झाली व तिची मूर्तिमंत मूर्ति डोळ्या

पुढें उभी राहून शहाजाद्याची चित्तवृत्ति अगदीं बेहोष होऊन गेली. इतकेंच नव्हे, तर त्यावेळीं आपण आहों कोठें, करितों काय याचेंही त्याला भान नव्हतें.

अशा स्थितींत फारसा वेळ गेला नाहीं तोंच सुमारें चारपांचशें सुंदर स्त्रिया, ज्यांचीं मुखें पौर्णिमेच्या पूर्णचंद्राप्रमाणें प्रफुल्लित आहेत व ज्या अल्पवयी असून अति मनोहर दिसत आहेत अशा त्या गजगतीनें बागेमध्यें येत होत्या. त्या स्त्रीसमुदायांत जी मुख्य स्त्री होती, तिचें वय सुमारें पंधरा सोळा वर्षांचें असून नुकतीच यौवनदशेला येऊन पोंहोचली होती. तिचा शरीरवर्ण बावनकशी सोन्यास लाजविणारा असून बांधा सडपातळ होता. दंतपंक्ति कुंदकळ्याप्रमाणें चमकत होती व कमलासारख्या प्रफुल्लित मुखकमलामध्यें हरिणासारखे सतेज नेत्र चमकत होते. केंश कुरळ असून पुष्पगुच्छ व रत्नजडित अलंकार यांच्या योगानें त्यांस फारच शोभा आली होती. कटी सिंहास लाजित करणारी असून जंघाद्वय कर्दलीस्तंभाप्रमाणें शोभत होत्या. असा तो स्त्रीसमुदाय ज्या ठिकाणीं शहाजादा बसला होता त्याच्या अगदीं नजीक आला, तेव्हां त्या स्त्रिया कदाचित् मंत्र तंत्र विद्येंत प्रवीण असतील व मागल्या सारखें आप-

णांस प्रतिबंधांत पडावें लागेल, अशा समजुतीनें शहाजाद्यानें शहपाल जादुगाराच्या कन्येनें दिलेल्या ताइतांतील मंत्र पढण्यास सुरवात केली. कारण तापलेलें दूध पितांना तोंड भाजलें असलें ह्मणजे जसें ताक फुंकून पितात, त्याप्रमाणें त्या वेळीं शहाजाद्याची स्थिति झाली. इतक्यांत शहाजादा ह्मणत असलेल्या मंत्राचा ध्वनि त्या स्त्रीसमुदायांतील कित्येक स्त्रियांच्या कानीं पडतांच त्या दचकून इकडे तिकडे पाहूं लागल्या, तों मदनासारखा शहाजाद्याचा सुंदर मुखेंदु त्यांच्या दृष्टीस पडला. जेव्हां त्या स्त्रियांनीं हा मजकूर आपल्या मुख्य यजमानणीस कळविला, तेव्हां तर ती शहाजाद्याचें मनोहर रूप पाहून कामज्वरानें अगदीं व्याकूळ झाली व मूर्छा येऊन धाडकन जमिनीवर पडली. त्याबरोबर तिच्या दासींची एकच धांदल उडून गेली. कित्येक त्या मल्का शहाजादीस सावध करण्याकरितां गुलाबपाणी अंगावर शिंपडूं लागल्या, कित्येक सुवासिक पुष्पें व अत्तरांच्या वासाचे हातरुमाल तिच्या नाकाशीं नेऊं लागल्या व कित्येकींनीं तर वाळ्याच्या पंख्यानें एकसारखा वारा घालण्यास सुरवात केली.

अशा प्रकारें बराच वेळ उपचार झाल्यावर मल्का

शहाजादी शुद्धीवर आली व मनाच्या उतावळेपणास दोष देऊन कदाचित् दासी आपली थट्टा करतील अशा विचारानें अगदीं लज्जित होऊन गेली होती तरी एका दासीसह ज्या ठिकाणीं शहाजादा जानआलम बसला होता तेथें जाऊन मोठ्या नम्रतेनें ह्मणाली, हे मनोहरस्वरूपी मुसाफरा, तुह्मी आज कोठून आलांत व असें कोणचें संकट आपणावर पडलें आहे कीं, त्या मुळें आपणास एकटेंच प्रवास करावा लागत आहे? शहाजादा त्या मल्का लावण्यवतीला पाहून जरी मोहित झाला होता, तरी मुद्दामच थोडासा त्वेष आणून ह्मणाला, हे हरामजादी, जरा तोंड संभाळून बोल. तुझ्यावर एखादें संकट पडलें असेल ह्मणूनच तूं असें बोलतेस. तूं कोण? मी कोण? कांहीं तरी ओळखदेख असल्या-शिवाय उगीच एखाद्याला विचारण्याचें परक्या स्त्रिला काम काय? हें ऐकून मल्का शहाजादी हंसून ह्मणाली, हे मुसाफरा; माझ्या प्रश्नांत तुह्माला वाईट वाटण्यासारखें व इतका क्रोध येण्यासारखें कांहीं नव्हतें. आतां तुमची व माझी ओळख नाहीं ही गोष्ट जरी खरी आहे, तरी ह्या जागेची मी मालकीण असल्यामुळें तुमची विचारपूस करण्याचा हक्क मला पोहोंचतो. सबब मेहेरबानी

करून विचारलेल्या प्रश्नाचा जबाब मिळावा. शहाजादा ह्मणाला, मी दुर्दैवी मनुष्य असून केवळ कर्मभोगानेंच अमीरीचा त्याग करून हा मुषाफरीपणा पतकरला आहे. आतां विचारल्या प्रश्नाचें पूर्वींच उत्तर कां दिलें नाहीं ह्मणशील, तर किती झालें तरी तूं श्रीमंत, तुझ्याबरोबर सेवेकरितां हजारों दासी आणि मी केवळ दुर्दैवी व तुमच्या मातीवर लोळणारा मुशाफर! तेव्हां ज्याप्रमाणें झोंपडींत राहून मोठ्या ऐषआरामीं सुंदर महालाचें स्वप्न पहावयाचें, त्याप्रमाणें म्यां तुझ्या प्रश्नाचें उत्तर काय द्यावें? शहाजाद्याचें हें भाषण ऐकतांच ती पंचशराच्या तडाक्यानें मोहित झालेली स्त्री बरोबरच्या दासींची भीडमर्यादा सोडून झटकन जाऊन शहाजाद्याच्या शेजारीं बसली.

नंतर शहाजादा ह्मणाला, हे सुंदरी, मीं आपल्या कर्माची कथा काय. सांगूं? केवळ माझा मीच प्रीतीच्या तडाक्यांत सांपडून आपल्या घरादाराचा त्याग केला. मला नाहीं कोणी सोबती आणि नाहीं कोणी रस्ता दाखविणारा. चालण्याच्या अतिशय श्रमामुळें पायांतून एकसारख्या रक्ताच्या धारा लागून राहिल्या आहेत. उन्हाच्या तापानें शरीर कसें व्या-

कुळ होऊन गेलें आहे. काय सांगू कर्माची कथा? रान हें घर व वनचर हे इष्टमित्र अशी माझी स्थिति आहे!! शहाजाद्याचें हें भाषण ऐकून मल्का मनांत समजली कीं, हा कोणी तरी शहाजादा आहे; परंतु मोहाच्या जाळ्यांत फसून गेला असावा. असो, एक वेळ ह्याला युक्तिप्रयुक्तीनें आपल्या घरीं तर घेऊन जावें; ह्मणजे मग हरप्रयत्नानें ह्याचें हृद्गत आपणास काढून घेतां येईल. असा विचार करून ती ह्मणाली, हे शहाजाद्या, ज्या अर्थीं तुह्मी माझ्या राज्यांत आलां आहांत त्या अर्थीं तुमचा आदरसत्कार करणें हें माझें कर्तव्य कर्म आहे. तेव्हां कोणत्याही प्रकारची शंका मनांत न धरितां माझ्या घरीं चला आणि आजची रात्र आराम करून सकाळीं इच्छेस वाटेल तसें करा. शहाजादा म्हणाला, माझ्या सारख्या फकिराला राजविलास भोगण्यास आमंत्रण करणें हा वेडेपणा होय. मला येथें राहण्यांत जो आनंद आहे, तो तुझ्या महालीं येण्यानें रहाणार नाहीं. तेव्हां व्यर्थ आग्रह करूं नको. शहाजादी म्हणाली, कोणी एखद्या गोष्टीचें आमंत्रण केलें असतां त्याचा प्रतिकार करणें हें सूज्ञ पुरुषांस उचित नाहीं; मग तुमची जशी इच्छा असेल तशी.

तेव्हां शहाजाद्यानें विचार केला कीं, आज पुष्कळ दिवस आपण अरण्यांतच प्रवास करीत असल्यामुळें मनुष्याचा सहवास घडला नव्हता, तो आज अनायासें प्राप्त झाला असून आपल्या न जाण्यानें या शहाजादीच्या मनाला वाईट वाटेल. असा विचार करून शहाजादा ह्मणाला, हे राजकन्ये, तूं अत्याग्रहानें आमंत्रण करीत आहेस, तर त्याचा प्रतिकार करणें हा केवळ मूर्खपणा होय. परंतु मी तुझ्याकडे आलों असतां अन्न, उदक ग्रहण करण्याची व उठण्या बसण्याची इच्छा नसल्यामुळें तुझ्या मनाला त्याचें वाईट वाटूं नये एवढ्याच करितां मी इतका वेळ आढेवेढे घेतले. आतां जर तुझी इच्छाच असेल, तर माझी कांहीं ना नाहीं. असें ह्मणून तो उठला, त्या बरोबर शहाजादीस अत्यानंद होऊन तीं उभयतां एकमेकांच्या हातांत हात घालून जाऊं लागलीं. वाटेनें जात असतां शहाजादा व शहाजादी अनेक प्रकारच्या गोष्टी बोलत होतीं. शहाजादा अनेक प्रकारच्या गोष्टी बोले त्या ऐकून शहाजादीचें अंतःकरण प्रेमाच्या योगानें कमलाप्रमाणें प्रफुल्लित होत होतें. तथापि विचारशक्तीच्या योगानें प्रेमपाशांत पूर्ण बद्ध झालेल्या

मनाचें ती शहाजादी वारंवार आकलन करीत होती. कारण, शहाजाद्याच्या सौंदर्यावर व गुणांवर लुब्धता जडल्यामुळें कदाचित प्रमाद होऊन लोकांत दुर्लौकिक होईल याची तिला अतिशय लज्जा वाटत होती. शिवाय दोहोरा—“परदेशीकी प्रीतसों, सब प्रकारकी हान ॥
निशिदिन बिछुरनकी व्यथा, बिछुरत प्राणपयान ॥१॥
शहाजादा हा मुसाफर असल्यामुळें त्याच्या संगतीपासून विरहव्यथेंत कालक्रमणा करावी लागणार हेंही ती जाणत असल्यामुळेंच वारंवार आपल्या उतावीळ झालेल्या मनाला आंवरीत होती.

सारांश, क्षणोक्षणीं मनाचा उल्हास व धैर्यानें क्षणोक्षणीं त्याचें निरसन अशा स्थितींत शहाजादी व शहाजादा अशीं उभयतां दासीसमवेत त्या बागेंतील मुख्य बंगल्याशीं जाऊन पोहोंचलीं. आधींच तो ज्याचें वर्णन करणेंही अशक्य असा नंदनवनासारखा रमणीय बाग, त्यांत अनेक कुशल कारागिरांनीं आपल्या अद्भुत चातुर्यानें बांधलेला व मौल्यवान वस्त्राभरणांनीं भूषित केलेला बंगला, मग तेथील शोभेचें वर्णन कोण करूं शकेल? अशा त्या अनुपमेय सौंदर्यवान बंगल्यांत शहाजादा व शहाजादी [illegible] गुप्तगो-

च्या सिंहासनावर उभयतां बसलीं. इतक्यांत एकीपेक्षां एक सौंदर्यानें अधिक अशा दासी, कोणी द्राक्षासव, कोणी विडे, कोणी उपहाराचे पदार्थ घेऊन आल्या. इतक्यांत अप्सरेप्रमाणें सौंदर्यवान व नृत्य गायनांत कुशल अशा मधुर स्वराच्या स्त्रिया येऊन नृत्यगायन करूं लागल्या. नंतर ती शहाजादी एका रत्नजडित प्यालयांत द्राक्षासव भरून शहाजाद्यास देऊं लागली; परंतु शहाजादा त्याचा अंगिकार करीना. तेव्हां शहाजादीनें विनंती केली कीं, आपण जरी प्रवासी आहां व सुखोपयोगी वस्तूंचा स्वीकार करावयाचा नाहीं असा जरी आपला नियम आहे, तरी आजच्या दिवस माझ्याकरितां तेवढा नेम राहूं द्या; ह्मणजे इतका वेळ झालेल्या समागमाचें चीज होऊन मला समाधान वाटेल. शहाजादीचें हें भाषण ऐकून शहाजाद्यानें मोठ्या प्रेमानें तिच्या हातांतील द्राक्षासवाचा पेला घेऊन तोंडाला लावला. यानंतर तीं उभयतांही पुष्कळसें मद्य पिऊन अगदीं बेहोष झालीं. शहाजादा तर इतका वेळ धारण केलेलें वैराग्य सोडून देऊन केवळ दिलदारीनें वर्तन करीत होता. या नंतर तीं उभयतां गच्चीवर

बसून पौर्णिमेच्या पूर्णचंद्र प्रभेचें सुख अनुभवित व नृत्यगायनानें मनोवृत्ति प्रफुल्लित करीत थोडासा उपहार करूं लागली. इतक्यांत एक दासी ह्मणाली, आज आमच्या शहाजादीच्या सुखाचें काय वर्णन करावें? पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशांत बसून चंद्रबिंबाप्रमाणें ज्याचें मुखकमल शोभत आहे अशा मदनपुतळ्याबरोबर जी सुखोपभोग घेत आहे तिचें भाग्य थोरच समजावयाचें! हें ऐकून शहाजादी दीर्घोश्वास टाकून ह्मणाली, तूं ह्मण- तेस हें सर्व खरें आहे; परंतु त्यांत खेद इतकाच कीं, आपण ज्याच्यावर प्रीति करावी त्याचें मन तिसऱ्याच ठिकाणीं लुब्ध झालें आहे. त्यावर शहाजादा ह्मणाला, ॥ दोहरा ॥ मै हूं परदेशी सखी मोसों करो न प्रीति ॥ क्षणभर मै होऊं अनत ज्यों बारूकी भीति ॥१॥ हे सुंदरी, एखाद्या सुंदर व तरुण राजपुत्राबरोबर जर तूं विवाह केलास तर त्याच्या संगतीनें तूं जो संसारसुख- स्वाद अनुभविशील, तो माझ्यासारख्या दुर्दैवी प्रवाशाच्या सहवासानें प्राप्त न होतां उलट तुला दुःख मात्र होईल. एवढ्या करितां तूं जो माझ्याशीं प्रीति करण्याचा वि- चार केला आहेस तो सोडून दे. हें ऐकून मल्का शहाजादी म्हणाली, हे मुशाफरा, तें असो; तूं कोठील

राहणार? जाणार कोठें? व घर सोडण्याचें कारण काय? एवढें कृपा करून सांगा. तेव्हां शहाजाद्यानें आपला खरा खरा संपूर्ण वृत्तांत व गुलछबूवर जडलेलें प्रेम वगैरे सर्व हकीकत निवेदन केली. ती ऐकून शहाजादीस अतिशय दुःख होऊन ती स्फुंदस्फुंदून रडूं लागली. तें पाहून जानआलम शहाजादा म्हणाला, इतका वेळ तूं हशीखुशींत असतां एकाएकीं दुःख करूं लागलीस याचें कारण काय तें सांग. शहाजादी दुःखानें बोलली, हे शाहाजाद्या, माझा बाप पूर्वीं मोठा पराक्रमी राजा होता. परंतु कांहीं कारणामुळें फकिरी स्थिति त्यास प्रिय वाटल्यामुळें सर्व राज्यकारभार प्रधानाच्या स्वाधीन करून ह्या वनामध्यें एक मंदीर बांधून त्या ठिकाणीं तो जगनियंत्या परमेश्वराचें ध्यान करीत राहिला आहे. त्याचा विचार ह्या पूर्वींच एखाद्या शहाजाद्याबरोबर माझा विवाह करून द्यावयाचा होता, परंतु मींच ती गोष्ट मान्य केली नाहीं. प्रस्तुत माझें मन तुझ्या ठिकाणीं लुब्ध झालें असून तूं तर ज्या सुंदरीचा दुनियेंत पत्ता नाहीं त्या स्त्रीवर मोहित झाला आहेस. असो. आतां मृत्यूशिवाय मला दुसरा कांहींच इलाज नाहीं. कारण प्रातःकाळ होतांच तूं कोठें जा-

शील, आणि मी कोठें राहीन. तुझ्याशिवाय मला कशी चैन पडेल! शिवाय तुझ्या ठिकाणीं माझें मन लुब्ध झालें आहे. व तूं माझा प्रतिकार करून निघून गेलास ही गोष्ट माझ्या आईबापास समजल्यावर ते काय ह्मणतील? सखीजन विनोदानें माझा उपहास करतील. सारांश, तूं निघून जाशील आणि मी मात्र शोकानें हा लोक सोडून निघून जाईन. माझा बाप, जादू, मंत्र, तंत्र व ज्योतिष इत्यादि विद्येंत प्रवीण आहे; परंतु माझ्या कर्माची रेषा मात्र तो जाणत नाहीं. असें ह्मणून ती मोठा आक्रोश करून रडूं लागली. हें पाहून शहाजाद्याचें अंतःकरण कळवळून तो ह्मणाला, हे सुंदरी, शोकाचा त्याग करून सावध हो. तूं जसें सांगशील त्याप्रमाणें वागण्यास मी तयार आहें; परंतु कांहीं दिवसपर्यंत धैर्य धरून रहा. कारण, जर मी प्रिय गुलछबूच्या शोधाला गेलों नाहीं; तर माझ्यापासून तुला कांहींच सुख होणार नाहीं. कां ह्मणशील, तर माझें मन तिच्या ठिकाणीं गुंतून राहिलें आहे. त्यामुळें आतांच माझ्यानें तुझ्या ह्मणण्यास रुकार देववत नाहीं. जानआलम शहाजाद्याचें हें भाषण ऐकून मल्का शहाजादीस अत्यानंद झाला. नंतर ती ह्मणाली, हे प्रि

यकरा, आतां आपण जें भाषण केलेंत तें मात्र पक्कें लक्षांत असूं द्या. नाहीं तर आपण ज्या स्त्रीवर लुब्ध झालां आहां, तिची प्राप्ति झाली ह्मणजे आनंदसुखांत रममाण होऊन जाल आणि मग माझ्यासारख्या हतभागी स्त्रिची आपणास आठवण राहणार नाहीं; असें मात्र होऊं देऊं नका. जानआलम शहाजादा शपथ घेऊन ह्मणाला, मला तुझा विसर पडेल ही गोष्ट तूं स्वप्नांत देखील आणूं नको. मी ज्या कार्याकरितां जात आहें, तें सिद्धीस गेल्याबरोबर ताबडतोब तुझ्या भेटीकरितां निघून येईन. आणि मग तुझ्या मनोदयाप्रमाणें सर्व गोष्टी होतील. तरी आतां दुःखाचा त्याग कर आणि आनंदाच्या गोष्टी बोल. कारण रात्र थोडी राहिल्यामुळें तुझा माझा वियोग होण्याची वेळ अगदीं नजीक येत चालली आहे. असें तो बोलत आहे तोंच कोंबडा आरवल्यामुळें जानआलम शहाजादा प्रातःविधि उरकण्याकरितां गेला. नंतर थोड्या वेळानें जेव्हां तो जाण्याकरितां निघाला तेव्हां मल्का शहाजादी ह्मणाली, जर आपणास थोडीशी फुरसूद असेल तर आपण माझ्या बापाची भेट घेऊन जावें अशी माझी इच्छा आहे; मग मर्जीस येईल त्याप्रमाणें करावें. जानआलम शहाजादा ह्मणाला, ठीक आहे, चल.

नंतर तीं उभयतां तेथून निघून ज्या ठिकाणीं मल्का

शहाजादीचा बाप रहात होता तेथें गेलीं. तेव्हां एक वृद्ध फकीर हातांत माळ घेऊन परमेश्वराचें एकाग्रतेनें ध्यान करीत बसलेला शहाजाद्याच्या दृष्टीस पडला. त्यास पाहून जानआलमनें साष्टांग प्रणाम केला, तेव्हां तो फकीर जानआलम शहाजाद्यास व आपली प्रियकन्या मल्का यांस पोटाशीं धरून आशिर्वाद देऊन ह्मणाला, तुमची उभयतांची जडलेली प्रीति मला ठाऊक आहे व त्याप्रमाणें तुह्मीं आपलें आयुष्य सुखासमाधानांत घालवावें अशी माझी मनापासून इच्छा आहे. असो; हे शहाजाद्या, ज्या इच्छेनें तूं आपलें घरदार व सर्व प्रकारचीं सुखें यांचा त्याग केलास, ती इच्छा पूर्ण करून लवकर परत ये व नंतर माझ्या प्रियकन्यकेबरोबर सुखानें कालक्षेप कर. मात्र ज्या मापुकीवर आषक होऊन तूं जात आहेस, तिच्या प्रेमपाशांत बद्ध होऊन तेथेंच राहूं नकोस. नाहीं तर तुझ्या ठिकाणीं सर्वस्वीं आपला देह अर्पण करून तुझ्या येण्याची मार्गप्रतिक्षा करीत राहणारी अशी प्रिय मल्का विरहव्यथेनें हा लोक सोडून स्वर्गास निघून जाईल व त्या योगानें मला मात्र अतिशय दुःख होईल असें करूं नकोस. असें म्हणून त्या वृद्ध

फकिरानें एक ताईत जानआलम शहाजाद्यास दिला आणि सांगितलें कीं, जेव्हां तुझ्यावर कोणत्याही प्रकारचें संकट येईल त्या वेळीं तूं परमेश्वराचें नामस्मरण करून हा ताईत पहात जा. शहाजाद्यानें मोठ्या आनंदानें तो ताईत घेतला व इच्छित कार्यभाग उरकून आपल्या दर्शनाकरितां लवकरच परत येतों असें सांगून पुन्हां साष्टांग प्रणाम करून तेथून निघाला. त्या वेळीं मल्का शहाजादी जानआलमच्या गळयास मिठी मारून स्फुंदस्फुंदून रडूं लागली. हें पाहून तिच्या पित्यानें व बरोबरच्या दासींनीं मल्केची समजूत करून सांगितलें कीं, कोणीही मनुष्य प्रवासास जावयास निघाला असतां त्याच्या जाण्याच्या वेळीं शोक करूं नये. सबब तूं आपलें दुःख आटोपून धर. हा शहाजादा थोर कुलांतील व सत्यवचनी आहे, सबब तो परमेश्वरकृपेनें लवकरच येऊन तुला भेटेल. अशा प्रकारें समजूत केल्यावर जानआलम शहाजादा आपल्या प्रिय स्त्रिची प्रेममिठी सोडवून व सर्वांचा निरोप घेऊन तेथून निघाला.

ज्या वाटेनें शहाजादा चालला होता, त्या वाटेकडे एकसारखे डोळे लावून मल्का पहात होती. शेवटीं

जेव्हां तो अगदीं दिसेनासा झाला, तेव्हां मात्र ती आपलें अंग जमिनीवर टाकून एकसारखा आक्रोश करूं लागली. हें पाहून तिच्या बापानें व दासींनीं अनेक प्रकारें समजावणी केली, परंतु तिचा शोक किमपीही कमी होईना. शेवटीं तिच्या बापानें तिला महालीं घेऊन जाण्याविषयीं दासींस आज्ञा केली, तेव्हां महत्प्रयासानें त्या तिला घेऊन महालीं गेल्या. त्या दिवसापासून मल्का शहाजादीची स्थिति अगदीं वेड्यासारखी होऊन गेली. तिनें अन्नपाणी अगदींच वर्ज्य केलें व रात्रंदिवस एकसारखी ती शोक करूं लागली. कोणी समजूत करूं लागलें ह्मणजे तेवढ्यापुरतें तिनें स्वस्थ असावें व लागलेंच ओक्साबोक्शीं रडण्यास सुरवात करून ऊर बडवून घ्यावा. कधीं कधीं तिनें अंगावरचीं वस्त्रेंच फाडावीं व एकसारखें सर्व बागभर धांवत सुटावें. सारांश, प्रेमपाशानें बद्ध झालेली ती मल्का शहाजादी विरहव्यथेनें अगदीं बेचैन होऊन रात्रंदिवस जानआलम शहाजाद्याचें ध्यान करीत त्याच्या येण्याची मार्गप्रतिक्षा करीत राहिली.

# प्रकरण ५ वें.

मल्का शहाजादीच्या बागेपासून सुमारें ४० मजल वर जानआलमच्या मापुकीचें जिरनिगार शहर होतें. त्या शहरापर्यंत पोपटानें सांगितलेल्या खुणांच्या रस्त्यानें शहाजादा अनेक प्रकारचीं दुःखें व हालअपेष्टा भोगीत जाऊन पोहोंचला. ती वेळ सुमारें तिसऱ्या प्रहराची असून एकाएकीं एक मोठी सतेज व डोळ्यांचें तेज दिपविणारी अशी चकचकीत वस्तु शहाजाद्याच्या नजरेस पडली. ती पहातांच हें काय असावें याबद्दल मोठें आश्चर्य वाटून ती पहाण्याच्या उद्देशानें शहाजादा थोड्या झपाट्यानें चालला असतां, थोडक्याच वेळानें ज्याच्यावर अनेक रंगीबेरंगी रत्नांचें कोंदणकाम केलें आहे असा जिरनिगार शहराच्या वेशीचा दरवाजा त्याच्या दृष्टीस पडला. त्या वेशीच्या बुरुजावर मोठमोठ्या तोफा डामलेल्या असून अनेक जवान गोलंदाज आपल्या कामांत अगदीं तत्पर आहेत व दरवाज्यावर हजारों शिपायी आपआपलीं हत्यारें सज्ज करून दक्षतेनें पहारा करीत आहेत असें पाहून शहाजादा चकित झाला. नंतर त्यानें तेथील एका मनुष्यास

या शहराचें नांव काय व येथें कोण सत्ताधीश एवढ्या कडेकोट बंदोबस्तानें राज्य करीत आहे असें विचारलें. तेव्हा तो मनुष्य समजला कीं, हा कोणी तरी शहाजादा असून मुशाफरी करण्याकरितां निघाला आहे. कारण, त्याच्या तोंडावरील तेज व इभ्रत-ही तो कोणत्या तरी राजघराण्यांतील पुरुष असावा असेंच दर्शवित असल्यामुळें तें वाटणें सहाजिक होतें. पुढें त्या मनुष्यानें या शहरास जिरनिगार शहर ह्मणतात असें सांगित्यावरोबर शहाजाद्याचा चेहेरा अधिकच टवटवीत दिसूं लागला. तो मनांत विचार करूं लागला कीं, मी या वेळीं स्वप्न पहात आहें किंवा माझें भाग्यच थोर ह्मणून मोठ्या प्रयासानें या प्रिय गुलछ-वूच्या शहरीं येऊन पोंहोंचलों; या शिवाय दुसरें कांहीं नाहीं. असा विचार करीत तो तेथून निघून शहरांत शिरला व मोठमोठ्या लोकांच्या एका पेक्षां एक सुंदर हवेल्या, मुख्य बाजार वगैरे नागरीक सौंदर्य पहात पहात चालला. तें लोकवस्तीनें गजबजलेलें धनाढ्य व अफाट शहर पाहून शहाजाद्यास समाधान वाटलें. नंतर त्यानें एका मनुष्यास किल्ला कोठें आहे असें विचारलें व त्यानें दाखविलेल्या रस्त्यानें तो मोठ्या उ-

त्कंठेनें चालला असतां, समोरून [illegible] प्रदर्शक काळे कपडे घातलेल्या लोकांचा एक मोठा थवा पाहून शहाजाद्याचें काळीज चर्र होऊन गेलें. एक पाऊलही पुढें टाकण्याची शक्ति त्याच्या अंगीं न राहून एकसारखे कुकल्पनेचे विचार त्याच्या मनांत उद्भवूं लागले. नंतर थोड्या वेळानें तो जराशी हिम्मत धरून ह्मणाला, शकुन तर बरा नाहीं-च; परंतु परमेश्वरानें खैर करावी व माझे सर्व मनोरथ शेवटास न्यावे. असा विचार तो करीत आहे इतक्यांत एक खोजा, ज्याचें तोंड दुःखाच्या योगानें अगदीं उ-तरून गेलें आहे असा समोरून घाई घाईनें येत होता. त्यास पाहून शहाजाद्यानें सलाम केला. त्यानेंही उ-लट सलाम केला. परंतु शहाजाद्याचा चेहेरा पाहून थक्क होऊन मनाशीं ह्मणाला, परमेश्वरानें हा मातीचा देह बनविण्यांत आपलें केवढें कौशल्य खर्च केलें! धन्य त्या विधात्याची!! असा विचार करून त्यानें शहाजा-द्यास आपण कोठून आलां व कोणीकडे जायाचें? असा मोठ्या लीनतेनें प्रश्न केला. शहाजादा ह्मणाला, खां साहेब, मी या शहरीं केवळ येथल्या मालकाची भेट घेण्याच्याच उद्देशानें आपलें घरदार सोडून आलों

आहे. पण प्रथम तुह्मी मला हें सांगा कीं, ही समोरू
जी मोठमोठी अमीर उमराव वगैरे मंडळी येत आहे, तिं
व तुह्मी काळा पोषाख कां केला आहे? खोज
दुःखाचा मोठा उसासा टाकून ह्मणाला, या शहराच्या
राजाची गुलछबु या नांवांची एक कन्या होती. तिच्या
सारखी सौंदर्यवान ह्या पृथ्वीवर दुसरी कोणीही मिळ-
णार नाहीं असें ह्मटलें असतां चालेल. तिच्या त्या
अनुपमेय सौंदर्याची कीर्ति ऐकून अनेक देशींचे
शहाजादे आपणास तिनें वरावें ह्मणून मोठ्या आशेनें
येथें आले; परंतु शहाजादी गुलछबूच्या एकही पसंतीस
न आल्यामुळें कित्येक निराश होऊन हाय हाय करीत
परत गेले व कित्येक आशाभंगानें प्राणासही मुकले.
अशा त्या लोकोत्तर सौंदर्यवान राजकन्येस आज चार
दिवसांपूर्वी कोणा एका जादूगारानें आपल्या इल्माच्या
बळानें महालांतून पळवून नेली. त्या खोजाच्या
तोंडचे हे शब्द ऐकतांच शहाजाद्यास मुर्च्छा येऊन
तो धाडदिशीं जमिनीवर पडला. हा प्रकार पाहून
तो खोजा मनांत समजला कीं, हा शहाजादा गुलछबू-
च्या अनुपमेय सौंदर्याची कीर्ति ऐकून तिच्या प्राप्ति
करितां मोठ्या आशेनें आला असावा व तिची

ही हकीगत ऐकून त्यास मूर्च्छा आली असावी. अरेरे! उगीच मीं त्याला हें वर्तमान कळविलें!! असा खेद करून त्यानें बराच वेळ शहाजाद्यास सावध करण्याचा प्रयत्न केला, परंतु तो शुद्धीवर येईना तेव्हां तो खोजा परत राजवाड्यांत गेला आणि बादशहास ह्मणाला, खुदावंत, आपल्या प्रिय गुलछब्रूची कीर्ति ऐकून तिच्याशीं विवाह करावा या इच्छेनें कोणी एक शहाजादा आपल्या नगरांत आला आहे. त्याची माझी आतांच भेट होऊन गुलछब्रूच्या संबंधाची झालेली हकीगत मीं त्यास सांगितली. ती ऐकून एकाएकीं मूर्छना येऊन तेथच्या तेथेंच निचेष्ट पडला. त्याला सावध करण्याकरितां मीं पुष्कळ उपाय केले; पण ते सर्व व्यर्थ गेले. काय सांगू खावंद! जर आपण एक वेळ त्याला पहाल तर आपल्या प्रिय गुलछब्रूची आठवणही होणार नाहीं! खोजाचें हें भाषण ऐकतांच बादशहानें त्यास घेऊन येण्याचा हुकूम केला. तो ऐकतांच कित्येक सेवक बरोबर घेऊन तो खोजा ज्या ठिकाणीं जानआलम शहाजादा मूर्छित होऊन पडला होता तेथें आला व त्यास उचलून राजवाड्यांत नेलें. नंतर बरेच शीतोपचार सुरू केल्यावर संध्याकाळच्या सुमा-

रास शहाजादा शुद्धीवर येऊन डोळे उघडून पहातो, तों एक मनुष्य राजकीय पोषाख करून सिंहासनावर बसला आहे, व कित्येक अमीर उमराव आपल्या जाग्यावर मोठ्या अदबीनें उभे आहेत. हें पाहून शहाजादा झटकन उठला व शिरस्त्याप्रमाणें त्यानें बादशहाची अदब बजाविली. बादशहानेंही मोठ्या प्रेमानें त्यास पोटाशीं धरून आपल्या शेजारीं बसविलें; व कोठील रहाणार वगैरे चौकशी केली. शहाजाद्यानें आपला संपूर्ण वृत्तान्त सांगून आपल्या प्रियकर गुलछब्रूची हकीगत विचारली. तेव्हां बादशहा ह्मणालाः—कोणी एक जादूगार पुष्कळ दिवसांपासून तिच्या तैनातीस राहिला होता. तो आज चार दिवसां मागें आपल्या विद्येच्या जोरानें शहाजादीस माझ्या कडेकोट बंदोबस्तांतून घेऊन गेला. त्या शोकानें मी आजपर्यंत मंदिरांतही गेलों नाहीं व अन्न पाणीही सेवन केलें नाहीं. शहाजाद्यानें विचारलें त्या जादुगारानें आपल्या प्रिय कन्येस कोणी-कडे नेलें या विषयीं कांहीं शोध लागला आहे काय? बादशहा ह्मणाला, येथून पांच कोशपर्यंतचा पत्ता लागतो; परंतु पुढें एक अग्नीचा किल्ला असल्यामुळें कांहींच शोध लागत नाहीं. तो सर्व प्रदेश जादूनें भारला

असल्यामुळें मनुष्याच्यानें तेथें जाववत नाहीं. शहाजादा ह्मणाला, आयुष्याची दोरी बळकट असली तर तिचा शोध लागणें कठीण आहे असें नाहीं. असें ह्मणून तो मोठ्या त्वेषानें उठून उभा राहिला. त्याबरोबर बादशहा त्यास पोटाशीं धरून ह्मणाला, बेटा, या भानगडींत तूं पडूं नकोस. कारण, आजपर्यंत जे जे ह्मणून मनुष्य मी गुलछबूच्या शोधाकरितां पाठविले त्यांपैकीं एकही परत ह्मणून आला नाहीं. असें असतां तूं आपला जीव जाणून बुजून धोक्यांत घालूं नकोस. हें माझें राज्य आहे त्याचा तूं सुखानें उपभोग घे आणि मी परमेश्वराच्या भजनांत आपला कालक्षेप करतों.

शहाजादा ह्मणाला, तुमचें राज्य तुह्माला लखलाभ होवो. मला जर राज्यसुखच अनुभवावयाचें असतें, तर मी आपले बापाचें राज्य सोडून कां आलों असतों? शिवाय लोक असेंही ह्मणतील कीं, ज्या शहाजादीच्या प्रेमपाशांत बद्ध होऊन हा सर्व सुखें सोडून व अनेक संकटें सोसून येथपर्यंत आला, त्या शहाजादीला तर जादुगारानें नेली; आणि हा मात्र निर्लज्जासारखा राज्यसुख अनुभवित पडला आहे. एवढ्याच करितां प्राण गेला तरी बेहेतर आहे; परंतु प्रिय गुलछबूचा शोध केल्या-

शिवाय मी कधींही स्वस्थ बसणार नाहीं. जें एक वेळ मनानें घेतलें, तें पुरें केल्याशिवाय कधींही राहूं नये. ज्या प्रियेकरितां अनेक संकटें सोसून या ठिकाणापर्यंत जिवंत येऊन पोहोंचलों, त्या प्रियेच्या मकाणापर्यंत मी जिवंतच जाऊन पोहोचेन, यांत बिलकूल शंका नाहीं. असें जर न झालें तर हा देह ठेवण्यांत काय अर्थ आहे? पहिल्यानें ज्या वेळीं मी गुलछत्रूच्या सौंदर्याची कीर्ति ऐकून घर सोडण्याचा विचार केला, त्या वेळीं अक्कल आणि प्रेम यांचा मोठाच झगडा लागून राहिला. अक्कल म्हणे—आपल्या आईबापास सोडून व राज्यसुखाचा त्याग करून जाऊं नकोस. प्रेम ह्मणे—कोणाचे आईबाप व कसलें राज्यसुख? जिच्यावर आपलें मन मोहित झालें, तिच्या प्राप्ति शिवाय सर्व सुखें व्यर्थ आहेत. सारांश, प्रिय गुलछत्रूच्या शोधाशिवाय मला दुसरें कांहीं एक नको.

शहाजाद्याचा हा दुराग्रह पाहून बादशहा कांहींच बोलला नाहीं. या नंतर कांहीं वेळानें दरबार बरखास्त होऊन सर्व अमीर उमराव आपआपल्या घरीं गेले; व बादशहा जानआलम शहाजाद्यास घेऊन महालीं गेला. जानआलमच्या संबंधानें सर्व हकीगत जनान-

खान्यांत समजली असल्यामुळें, राणी त्याला पहाण्यास आतुर झाली होती, तीही त्या ठिकाणीं आली. तिनें गुलछबूच्या शोधास जाऊन आपले प्राण धोक्यांत न घालविण्याविषयीं शहाजाद्यास बराच आग्रह केला, पण तो आपला हट्ट कांहीं केल्या सोडीना. तेव्हां तिचा निरुपाय झाला. इतक्यांत एका खोजानें पक्वान्नांनीं भरलेलीं ताटें तेथें आणून ठेविलीं. नंतर गुलछबूची आई शहाजाद्यास भोजनास उठण्याबद्दल आग्रह करूं लागली. परंतु तो ह्मणे, मी गुलछबूचा शोध लावल्याशिवाय अन्नच ग्रहण करणार नाहीं. तेव्हां राणी ह्मणाली, जर तूं उपाशी रहाशील तर आह्मीही कोणी अन्नाला शिवत नाहीं. ह्या गोष्टीचें शहाजाद्यास संकट पडून तो जेवावयास उठला. नंतर त्रिवर्गाचें भोजन वगैरे आटोपल्यावर शहाजादा एका कोंचावर निजण्याच्या बहाण्यानें पडला. परंतु ज्याच्या मनांत कामाग्नि भडकून गेलेला व त्यांत प्रिय माशुकीचें नाहींसें होणें या दोन गोष्टी घोळत होत्या त्याला झोंप कोठून येणार? प्रिय सखीची भेट कशी होईल, आपण त्या जादूच्या एलमांत सांपडलों तर त्यांतून आपली सुटका कशी होईल, इत्यादि विचार त्याच्या मनांत एकसारखे घोळत

होते. शेवटीं असे अनेक तऱ्हेचे विचार चालले असतां एकदांचें उजाडलें. त्या बरोबर शहाजादा प्रातर्विधि उरकून प्रिय गुलछबूच्या शोधास जाण्यास निघाला. बादशहानें व राणीनें न जाण्याबद्दल पुष्कळ बोध केला, परंतु तो न ऐकतां शहाजादा ज्या बाजूला बादशहानें तिच्या शोधाचा पत्ता सांगितला होता त्या बाजूच्या रस्त्यानें निघून गेला.

प्रेमाचा तडाका किती विलक्षण आहे पहा! गुलछबूच्या शोधास जाणें ह्मणजे शुद्ध मृत्युमुखीं पडणें होय; असें जरी बादशाहानें सांगितलें होतें, तरी पंचशराचें शौर्य आंगीं आलें असल्यामुळें कशाचीही दिक्कत न बाळगितां शहाजादा एक सारखी पांच कोस जमीन चालून गेला. त्या वेळीं अग्नीनें प्रदीप्त असा एक किल्ला त्याच्या दृष्टीस पडला. त्या किल्ल्यांतून एक सुवर्ण तेजाचा हरीण बाहेर पडून अकस्मात तेथच्या तेथें नाहींसा झाला. हा प्रकार पाहून शहाजादा आश्चर्य चकित होऊन त्यानें मल्का शहाजादीच्या बापानें दिलेला ताईत उघडून पाहिला. त्यांत असें लिहिलेलें दृष्टीस पडलें कीं, "जर कोणी हा हरीण नेम धरून एकाच बाणानें मारील, तर हें सर्व जादूचें

इंद्रजाल नष्ट होईल." हें पाहून शहाजाद्यास थोडी हुपारी आली व तो आपला तिरकमठा सज्ज करून हरीण केव्हां दृष्टीस पडतो याची वाट पहात राहिला. थोडक्याच वेळांत तो पूर्वीचा हरीण दृष्टिगोचर झाला, त्याबरोबर शहाजाद्यानें परमेश्वराचें नामस्मरण करून असा एक तीर मारला कीं, त्याबरोबर तो हरीण गतप्राण होऊन जमिनीवर पडला. इतक्यांत "हां धरा, जाऊं देऊं नका." असा मोठा शब्द होऊन एकाएकीं अगदीं गर्द अंधार पडला. पुढें थोडक्याच वेळानें सूर्याचा प्रकाश पडून तो अग्निप्रदीप्त किल्ला दिसेनासा झाला. फक्त ज्या ठिकाणीं हरीण मरून पडलें होतें त्या ठिकाणीं एक अक्राळ विक्राळ शरिराचा पुरुष, कपाळीं शेंदराचा मळ.ट भरलेला, आंगावर रक्त पुष्पांच्या माळा घालून रक्तानें स्नान केलेला, गळ्यांत हाडकांच्या माळा, कंबरेला काळा भुजंग वेष्टण केलेला असा दृष्टीस पडला. हा सर्व प्रकार बादशाहानें पाठविलेले हेर दुरून पहात होते, त्यांनीं जाऊन बादशहास कळविला. तेव्हां त्यांस शहाजाद्याच्या पराक्रमाबद्दल अतिशय आनंद होऊन पुढें काय होतें तें पहाण्याकरितां त्यानें त्यांस परत पाठविलें.

इकडे शहाजादा ज्या ठिकाणीं पूर्वी किल्ला दिसत होता त्या ठिकाणीं गेला, तों कुंभाराच्या चाकाप्रमाणें फिरणारा असा एक लहानसा किल्ला त्याच्या नजरेस पडला. त्या किल्ल्याला चार दरवाजे असून ते बंद होते; व त्याजवर नजर न ठरण्यासारख्या वेगानें तो फिरत होता. शहाजादा त्या किल्ल्याजवळ गेल्याबरोबर आंतून मोठ्यानें असा ध्वनि निघाला कीं, " हे सुंदर पुरुषा, उगीच आपला प्राण धोक्यांत घालण्याकरितां कशाला पुढें येतोस ? आलास तसा माघारा जा. तुझें सौंदर्य पाहून हा अपराध एक वेळ माफ केला आहे." हें ऐकतांच शहाजादाही मोठ्यानें ओरडून म्हणाला,–मला गुन्हा माफ करणारा तूं कोण आहेस तो पुढें ये; म्हणजे एका क्षणांत नाहींसा करून टाकतों. हें ऐकतांच किल्ल्यांतील दुसऱ्या जादुगारानें आपल्या कुलस्वामिणीचें नांव घेऊन कांहीं उडीद मंत्रून आकाशांत फेंकले; त्याबरोबर प्रचंड वारा सुटून मोठमोठाल्या पाषाणांचा व अग्नीचा एकसारखा वर्षाव होऊं लागला. हें पाहून शहाजाद्यानें मलकेच्या बापानें दिलेला ताईत उघडून पाहिला. त्यांत लिहिलें होतें कीं, "हा ताईत किल्ल्याच्या भिंतीला लावला

असतां सर्व इंद्रजाल नष्ट होईल." शहाजाद्यानें तसें करतांच पूर्वीप्रमाणें कांहीं वेळ काळोख पडला व थोड्या वेळानें पुन्हां सूर्यप्रकाश पडून सर्व इंद्रजाल व किल्ला वगैरे नाहींसा झाला. फक्त एक लहानशी वाळूची टेंकडी व तिजवर बसलेली गुलछत्रु यांशिवाय तेथें कांहींच दृष्टीस पडेना. शहाजाद्याची स्थिति गुलछत्रूस पाहिल्याबरोबर अगदीं वेड्यासारखी होऊन तो एकसारखा नाचूं उडूं लागला. हें पाहून शहाजादी गुलछत्रु ह्मणाली "हें काय करितां? तुह्माला वेड लागलें आहेसें वाटतें! येथें तुमच्या माझ्याशिवाय दुसरें कोणी नाहीं ह्मणून इतकी उद्धटपणाची तुमची वागणूक मला आवडणार नाहीं." जिच्यावर आपण मनापासून प्रेम करितों व जिच्या प्राप्तिकरितां जिवापाड संकटें आलीं तरी त्याची पर्वा करीत नाहीं, त्या गुलछत्रूच्या तोंडचीं हीं अक्षरें ऐकतांच शहाजाद्यास अतिशय वाईट वाटून तो अगदीं बेहोप होऊन निचेष्ट पडला. ही त्याची स्थिति पाहून गुलछत्रूसही वाईट वाटलें. व ज्यानें आपल्या मुक्ततेकरितां एवढे श्रम केले त्यास अशा स्थितींत ठेवणें बरोबर नाहीं असें वाटून तिनें शहाजाद्याचें मस्तक उचलून आपल्या मांडी-

वर घेतलें आणि पदरानें वारा घालण्यास सुरवात केली. थोड्या वेळानें जानआलम शहाजादा शुद्धीवर आला व नेत्र उघडून पाहूं लागला, तों आपली प्रियतमा आपलें शीर मांडीवर घेऊन पदरानें वारा घालीत आहे. हें पाहून त्यास बरेंच समाधान वाटलें. इतक्यांत शहाजादा शुद्धीवर आला असें पाहून गुलछबूनें आपली मांडी उशाखालून काढून घेतली. तेव्हां शहाजादा ह्मणाला, हे सुंदरी, तुझ्या प्राप्तिकरितां अश्रांत श्रम करण्याचीहि मीं दिकत बाळगली नाहीं; आणि तूं मात्र थोडेसे श्रम झाल्याबरोबर कंटाळून गेलीस हें ठीक नव्हे. जानआलमचें हें बोलणें ऐकून गुलछबु जरासा रागाचा आवेश आणून ह्मणाली, अनोळखी स्त्री एकटी पाहिली ह्मणजे तिची अशी अमर्यादा करणें हें शहाण्या मनुष्यास उचित नाहीं. तूं कोण? मी कोण? कांहींएक संबंध नसतां उगाच भलभलते शब्द उच्चारण्यांत अर्थ काय? आतां या उप्पर जास्त बोलून मला त्रास देऊं नको.

जानआलम शहाजाद्याचा व गुलछबूचा असा संवाद चालला आहे तोंच, हेरांनीं गुलछबूची शहाजाद्यानें मुक्तता केल्याचें वर्तमान कळविल्यावरून स्वतः राजा

त्या ठिकाणीं आला. आपल्या मुलीस व शहाजाद्यास सुखरूप पाहून बादशाहाचा आनंद त्रिभुवनांत मावेनासा होऊन त्यानें उभयतांसही पोटाशीं कवळून धरलें. नंतर शहाजाद्याच्या शौर्याची थोडा वेळ प्रसंशा करून स्वारी आनंदप्रदर्शनार्थ मोहोरा व रुपये उधळीत परत नगरांत आली. सर्व नागरिक जनांस राजकन्येच्या येण्यानें अतिशय आनंद होऊन तन्निमित्त घरोघर आनंदोत्सव सुरू झाले. स्वतः बादशहानेंही सर्व नगर शृंगारून मोठा उत्सव सुरू केला व सर्व खजिना दानधर्म करण्यांत खैरात केला. गुलछबूच्या आईस शहाजाद्यानें आपल्या मुलीची मुक्तता केली याबद्दलचे अतिशय उपकार वाटून ती ह्मणाली, जानआलमच्या साह्यानें जसे आमचे मनोरथ पूर्ण झाले, तसे गुलछबु देऊन त्याचेही मनोरथ पूर्ण केले पाहिजेत. हे शब्द ऐकून गुलछबूस राग येऊन ती ह्मणाली, आई, हा तुझा विचार मला अगदीं आवडत नाहीं. कारण, किती झाला तरीं तो मुसाफर, आणि मी सार्वभौम बादशहाची मुलगी. तेव्हां त्याचा माझा संबंध कसा जडावा? आतां तूं ह्मणशील कीं, त्यानें तुझी त्या जादुगाराच्या हातून मुक्तता केली; परंतु त्यांत त्याचा मी उपकार मानीत

नाहीं. कारण, माझें आयुष्य वळकट व त्या जादुगा राचे हातून माझी सुटका होणें ही गोष्ट ईश्वराच्य मनांत होती ह्मणूनच घडून आली; येरवीं कधींही असें झालें नसतें. ह्मणून तुला साफ सांगतें कीं, मी अशा यःकश्चित व मुपाफर मनुष्याबरोबर कधींही विवाह करणार नाहीं. याउप्पर जर तूं विशेष आग्रह कर-शील, तर मी आपल्या जिवाचें काय करीन हें कळूं देणार नाहीं. माझा विवाह करणें तर एखादा आपल्या योग्यतेचा व सुस्वरूप शहाजादा पाहून त्याचे बरोबर खुशाल करा. गुलछबूचें हें भाषण ऐकून तिच्या आईस अतिशय वाईट वाटलें; परंतु कन्येपुढें नाइलाज होऊन ती त्यावर अधिक कांहींच बोलली नाहीं. इकडे नगरांत सुमारें एक महिनापर्यंत सारखा उत्सव चालू होता. मुख्य मुख्य रस्त्यांवर व घरोघरीं नाच रंग चालले होते. सर्व नागरिक जनांस बादशहा-कडून दररोज मेजवानी होत होती. फकीर फुकडे व गोरगरीब यांस सारखा दानधर्म चालू होता. सारांश जिकडे तिकडे आनंदिआनंद होऊन ज्याच्या त्याच्या तोंडून शहाजाद्याच्या पराक्रमाच्या गोष्टी निघत होत्या. आणि सर्व लोक शहाजाद्याबरोबर गुलछ-

बूचें लग्न होऊन उभयतां दीर्घायुषी व्हावींत व त्यांनीं सर्व सुखाचा आनंदानें उपभोग घ्यावा ह्मणून परमेश्वराची प्रार्थना करीत होते.

---

## प्रकरण ६ वें.

एके दिवशीं बादशहा महालांत गेला आणि स्वस्त्रीस ह्मणाला—जानआलम शहाजाद्याचे आपणावर अतिशय उपकार आहेत. आणि सर्व लोक जाणत आहेत कीं, त्यानें केवळ आपल्या प्रिय गुलछबूच्या सौंदर्यावर लुब्ध होऊन तिची प्रीति व्हावी एवढ्या करितां राज्यवैभवाचा त्याग केला; आणि जिवावर उदार होऊन जादुगाराच्या तडाक्यांतून तिची सुटका केली. वास्तविक शहाजादा जर येथें आला नसता, तर प्रिय गुलछबूचें रूप पुन्हां आपल्या दृष्टीस पडलें नसतें. तव्हां आजचें काम उद्यांवर न टाकतां लवकरच तिचा शहाजाद्याबरोबर विवाह करून शहाजाद्याचे उतराई झालें पाहिजे. तर आतां तूं गुलछबूची भेट घेऊन तिला ही हकीगत कळीव ह्मणजे उद्यांपासून लग्नाच्या तयारीला लागूं. असें ह्मणून बादशहा निघून गेला. नंतर राणीनें गुलछबूस आपल्या

महालीं येण्याचा निरोप पाठवून दोन चार वृद्ध स्त्रियांसही बोलाविलें. गुलछबूच्या मैत्रिणी हें वर्तमान ऐकून तिच्यासह राणीच्या महालीं आल्या. तेव्हां प्रथम राणीनें गुलछबूस पोटाशीं धरून प्रेमानें कुरवाळलें आणि आपल्याजवळ बसवून ह्मणाली,—हे माझ्या लाडके, या संसारात अशी चाल आहे कीं, अमिरापासून तों फकिरापर्यंत कोणाचीही कां मुलगी असेना, ती आईबापाजवळ सदोदित रहात नसते. तसेंच प्रतिष्ठित मनुष्याच्या घरीं तर तरुण मुलीचें रहाणें अगदीं गैर आहे. तुझ्याकरितां एक शहाजादा आपलें घरदार व राज्यवैभव यांचा त्याग करून अनेक संकटें सोशीत येथपर्यंत आला; व त्याच्याच योगानें हें तुझें सकुमार मुख पुन्हां आमच्या नजरेस पडलें. तो शहाजादा स्वरूपानेंही अतिशय सुंदर असून सर्व नगर त्याच्या सौंदर्याचें व शौर्याचें वर्णन करीत आहे. आईचें हें भाषण ऐकून गुलछबु रडूं लागली आणि ह्मणाली—त्याच्या स्वरूपाचें वर्णन करण्याची वास्तविक कांहीं जरूर नव्हती. कारण ती परमेश्वराची लीला आहे. त्यानें ह्या जगांत कित्येकांना सुस्वरूप दिलें आहे, कित्येकांना कुरूप केलें आहे. लंगडे, पांगळे,

आंधळे, मुके, बहिरे, थोटे वगैरे कित्येक प्राणी ह्या जगांत आहेत. कोठें ऊन, कोठें सावली, कोठें नगर, कोठें गांव, हें आहेच. या संसारांत एकमेकांस सहाय्य करणें हें मनुष्यमात्राचें कर्तव्यच आहे. जर हा आला नसता तर दुसरा कोणी तरी मला जादुगाराच्या तडाक्यांतून सोडविता. वास्तविक विहिरींतून निघून आडांत पडल्यासारखीच माझी स्थिति झाली आहे. ज्याच्या त्याच्या तोंडून हा आला म्हणूनच माझी सुटका झाली असे उद्गार निघतात. कोणाला ठाऊक हा कोण मनुष्य कोठून आला, व कोण आहे. उगीच आपल्याला शहाजादा म्हणवित असेल झालें! हे आई, मी तुझ्या सर्वस्वीं आधीन आहें. जर तूं मला एखाद्या विहिरींत लोटशील तरी मी त्यांत आनंद मानीन; परंतु नुसत्या रूपरंगावर नजर देऊन त्याच्याशीं माझा विवाह करण्याच्या भरीस पडूं नकोस. आतां त्याचे आपल्यावर उपकार झाले आहेत तर पुष्कळशी धनदौलत किंवा जहागिरी देऊन त्याचें उतराई व्हावें हें मला बरें दिसतें.

हें ऐकून राणी हंसून म्हणाली,—माझ्या लाडके, तूं त्या शहाजाद्याची बरीच प्रतिष्ठा राखिलीस! अग, त्या

विचाऱ्याला जर द्रव्याची किंवा इनाम जहागिरीची जरूर असतां, तर तो आपल्या बापाचें राज्य सोडून येथें कां आला असता? हें ऐकून गुलछबूच्या मैत्रिणी ह्मणाल्या, राणीसाहेब, तुह्मी ज्याला शहाजादा ह्मणतां, तो वास्तविक शहाजादा नसून कोणीतरी साधारण मनुष्य आहे अशी गुलछबूची समजूत झाली आहे आणि त्यामुळेंच ती त्याच्याशीं विवाह करण्याचें कबूल करीत नाहीं असें आह्माला वाटतें. यावर गुलछबु कांहींच बोलली नाहीं. नंतर राणीनें बोलावलेल्या वृद्ध स्त्रिया गुलछबूस ह्मणाल्या, आईबाप सांगतील तसें न ऐकणें ह्मणजे केवळ देवाची आज्ञा मोडण्यासारखें आहे. ज्यांनीं तुझें लहानपणापासून लडिवाळपणानें पालनपोषण केलें व ज्यांना तूं केवळ जीव कीं प्राण, ते तुझ्या अनहिताचा विचार कसा बरें मनांत आणतील? जेणेंकरून तुझ्या जिवाला सुख तेंच त्यानां सुख. असें असतां व्यर्थ आपलाच हट्ट धरण्यांत अर्थ काय! तसेंच जानआलम हा शहाजादा नाहीं असें तूं ह्मणतेस, परंतु तुझा बाप आपल्यापेक्षां कमी दर्ज्याच्या मनुष्याशीं आपला संबंध जोडून घेईल असें आह्मांला वाटत नाहीं. ह्या करितां तूं आपला हट्ट सोडून

आईबाप सांगतील तें ऐकावेंस हें आह्माला बरें वाटतें. हें त्या वृद्ध स्त्रियांचें भाषण ऐकून गुलछत्रु कांहींएक न बोलतां फक्त गालांतल्या गालांत हंसली मात्र. तें पाहून तिच्या आईस व त्या वृद्ध स्त्रियांस आपलें ह्मणणें गुलछत्रूस मान्य झालें असें वाटून आनंद झाला. या नंतर कांहीं वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा होऊन गुलछत्रु मैत्रिणीसह आपल्या महालीं निघून गेली.

इकडे बादशहानें दरबारांत जाऊन प्रधानास बोलावून आणलें आणि त्यास सांगितलें कीं, ज्या शूर शहाजाद्यानें माझ्या काळाच्या दाढेंत सांपडलेल्या प्रियकन्येस सोडवून आणलें व तिच्यावर ज्याचें पूर्ण प्रेम जडलें आहे, त्या जानआलम शहाजाद्याबरोबर मी तिचें लग्न करणार आहें. तो शहाजादा केवळ प्रेमपाशांत बद्ध होऊन मुषाफरी करीत एकटा येथें आला असल्यामुळें त्याचें येथें दुसरें कोणी नाहीं. ह्या करितां तुह्मी खजिन्यांतील लागेल तितकें द्रव्य खर्चून आपल्या हिराबागेंत मोठ्या थाटाची त्याच्या तर्फे तयारी ठेवून बाकीची इकडील व्यवस्थाही करण्यास हुकूम द्या. बादशहाच्या तोंडचीं हीं अक्षरें निघतांच प्रधान मोठ्या आनंदानें आज्ञेप-

माणें व्यवस्था करितों असें सांगून निघून गेला. नंतर बादशहानें पंडित व ज्योतिषी बोलावून गुलछब्रूच्या लग्नाकरितां सुमुहूर्त्त पाहण्यास सांगितला. त्यांनीं राशी परत्वें घटित मान पाहून न बृहस्पती व चंद्रमा एकस्थानीं आहेत असा लग्न मुहूर्त ठरविला; आणि तेथील रीत रिवाजाप्रमाणें गुलाबी जोडे वधूवरांच्या पायांत घालविले.

जादूगाराच्या प्रचंड इंद्रजालांतून प्रिय गुलछब्रूची मुक्तता केल्यावर, आपल्या विषयीं गुलछब्रूच्या मनांत अप्रेम आहे असें पाहून जानआलम शहाजाद्यास अतिशय वाईट वाटत होतें. इतकेंच नव्हें तर जिच्या प्रेमाकारितां आपण अनेक प्राणांत संकटें सोसलीं, तिचें आपल्यावर प्रेम नाहीं अशा स्थितींत जगण्यापेक्षां जर त्या जादूगाराच्या हातून आपणास मृत्यु आला असता तर फार बरें होतें, असें त्याला वारंवार वाटूं लागून तो दिवसें दिवस अगदीं क्षीण होत चालला होता. परंतु जेव्हां ज्योतिषांनीं लग्नतिथि ठरविली व वाक्निश्चयाचा गुलाबी जोडा पायांत घालण्याचा समारंभ झाला, तेव्हां जानआलम शहाजाद्याच्या आनंदास तर पारावार नाहींसा झाला. लग्नतिथी केव्हां येते व प्रिय गुलछब्रूची व आपली भेट केव्हां होते असें शहा-

आधास होऊन गेलें होतें. पोपटानें गुलछबूच्या सौंदर्याची वाखाणणी केल्यापासून अशी सौंदर्यलतिका आपणास प्राप्त करून घ्यायाची अशी जी इर्षा शहाजाद्याचे मनांत उद्भवली होती, तिचें परमेश्वर कृपेनें सार्थक झालें असें पाहून त्या जगन्नियंत्याची जान आलमानें स्तुति केली; आणि आनंदीआनंदांत लग्नतिथीची चातकाप्रमाणें वाट पहात राहिला.

बादशहा आपल्या प्रिय कन्येचें लग्न जानआलम शहाजाद्याबरोबर लावणार अशी बातमी शहरांत पसरतांच सर्व नगरवासी लोकांस अत्यानंद होऊन जो तो आपआपल्या सामर्थ्या प्रमाणें घरोघर आनंदोत्सव करूं लागला. सर्व नगर श्रृंगारून जागोजाग नाच बैठका सुरू झाल्या; नाना देशचे राजे लग्नसमारंभाकरितां येऊं लागले; आनंदोत्सवाप्रित्यर्थ सर्वांनीं रंगीत कपडे वापरावे असा राजकीय हुकूम सुटला, त्यामुळें सर्व नगर; रंगीबेरंगी फुलांच्या ताटव्याप्रमाणें चमकूं लागलें; रस्तोरस्तीं गुलाबपाण्याचीं व केशरी रंगाची अनेक कारंजीं उडूं लागलीं; व मेजवान्यांची एकच गर्दी उडून गेली. नागरिक जनांना ज्याच्या त्याच्या धर्माप्रमाणें बादशहाकडून मेजवान्या मिळूं लागल्या. सारांश, सर्व शहरांत

एकच गर्दी उडून गेली होती. लग्नतिथीच्या दिवशींचा थाट काय वर्णावा! सार्वभौम राजाच्या प्रियकन्येचें लग्न तें! त्याचें जितकें वर्णन करावें तितकें थोडेंच!! सुर्योदयापासून मंगलवाद्यांचा, स्तुतिपाठकांचा, वंदिजनांचा व शुभमंत्रांचा जयघोष सुरू झाला. सर्व लोकांची एकच गर्दी उडून गेली. नाना देशाचे राजे बादशाहास करभार अर्पण करूं लागले. शेवटीं लग्नमुहूर्त येतांच वधुवरांच्या स्वाऱ्या तेथील रिवाजाप्रमाणें मुख्य देवालयांत जाण्याकरितां निघाल्या. चौघडे, नगारे, वाजंत्री, लष्करी वाद्यें यांचे ताफे चालूं लागले. हत्ती शृंगारून त्यांवरून मोहोरा व रुपये उधळूं लागले. हजारों नायकिणींचें नृत्यगायन सुरू झालें. लष्करी पलटणी व देशोदेशींचें सैन्य, नागरिक जन, अमीर उमराव, देशोदेशींचे राजे इतक्या थाटानिशीं वधुवरांची स्वारी देवालयांत गेल्यावर मुख्य उपाध्यानें रिवाजाप्रमाणें उभयतां वधुवरांस आशिर्वादयुक्तमंत्रांनीं जानआलम शहाजाद्याचें व सौंदर्यलतिका गुलछबूचें लग्न लावलें. त्या वेळीं शहाजाद्यास आपण स्वप्नांत आहों कीं काय असें वाटूं लागलें. अशी सौंदर्यपुतळी स्त्री आपणास लाधली याबद्दल धन्यता वाटून

परमेश्वराच्या लीलेचें तो मोठें आश्चर्य करूं लागला. गुलछबूचीही स्थिति तशीच होती. तिची जादूगाराच्या प्रतिबंधांतून शहाजाद्यानें मुक्तता केली त्या वेळींच त्याचें सौंदर्य व शौर्य पाहून त्याच्यावर तिचें प्रेम बसलें होतें. तथापि आपला उतावळेपणा उघडकीस न यावा ह्मणूनच तिनें पहिल्यानें शहाजाद्याबरोबर विवाह करण्याचा मनोदय दर्शविला नाहीं. असो. लग्नविधि आटोपल्यावर वऱ्हाडी मंडळीस मेजवान्या सुरू झाल्या. पुढें मोठ्या थाटानें भोजनविधि उरकल्यावर पानगुलाब व नृत्यगायनाच्या मजलसी सुरू झाल्या.

इकडे शहाजाद्यास प्रिय गुलछबूची रंगमहालीं एकांतांत केव्हां भेट होते असें होऊन गेलें होतें. शेवटीं एक खोजा येऊन त्यानें महालीं चलण्याविषयीं विनंति करितांच शहाजादा अत्यानंदानें जाण्यास निघाला. घर सोडल्यापासून आजपर्यंत झालेल्या परिश्रमाचें आज साफल्य होणार या आनंदसागरांत त्याचे अनेक मनोराज्याचे विचार चालले होते. तिकडे गुलछबूचीही तशीच स्थिति झाली होती. अप्सरेप्रमाणें जिचें सौंदर्य व पूर्ण यौवनदशेला जी आलेली, तिची तशी स्थिति होणें सहाजिक आहे. पुढें जानआलम शहाजाद्याची स्वारी

गुलछबूच्या महालीं आल्यावर काहीं वेळ उभयतांच्या प्रेमाच्या गोष्टी होऊन नंतर एकमेकांनीं एकमेकांस आपली संपूर्ण हकीगत निवेदन केली. शहाजाद्यानें आपला वृत्तान्त सांगितला त्या वेळीं, जादुगारणीची हकीगत ऐकून गुलछबूस वाईट वाटलें; परंतु मलका शहाजादीचें वर्तमान ऐकून ती मुद्दाम हंसली. यानंतर परस्परांच्या कांहीं वेळ प्रेमपूर्वक गोष्टी होऊन उभयतांही आनंदानें झोंपीं गेलीं.

लग्नसोहळा आटोपल्यावर बादशहानें शहाजाद्यास राहण्याकरितां एक नवाच महाल तयार करून दिला. त्या ठिकाणीं तो गुलछबूसहवर्तमान मोठ्या आनंदानें सुखविलास भोगीत कालक्रमणा करूं लागला.

---

## प्रकरण ७ वें.

इकडे बिचारी मलका शहाजादी जानआलम शहाजाद्याच्या विरहानें रात्रंदिवस एकसारखी शोक करीत होती. अन्नपाणी व सुखोपभोग यांचा तिला अगदीं कंटाळा आला. शहाजाद्याचें तें सुस्वरूप मुखकमल पुन्हां केव्हां दृष्टीस पडेल असें तिला होऊन गेलें होतें. पाण्यावांचून जसा मासा तळमळतो,

तशी ती सदा सर्वकाळ तळमळत असे. तिच्या सख्या व दासदासी तिची अनेक प्रकारें समजूत करीत असत. ते ह्मणत—हे शहाजादी, तूं असा शोक करूं नकोस. परमेश्वराचें रात्रंदिवस स्मरण करीत जा ह्मणजे तो तुझी व तुझ्या प्रियकराची लवकरच भेट करील. असा नेहमीं शोक करीत रहाशील तर कसें होईल ? हल्लींच तुझ्या शरिरांत कांहीं त्राण नाहींसें झालें आहे. आणि अशा स्थितींत जर तूं बेहोप रीतीनें वागशील, तर शहाजादा येईपर्यंत तूं परलोकचा मार्गही धरशील ! तेव्हां असा वेडेपणा न करितां स्वस्थ अंतःकरणानें रहा ह्मणजे थोडक्याच दिवसांत शहाजाद्याच्या समागमाचा सुखानंद अनुभवशील. हें त्यांचें भाषण ऐकून शहाजादी ह्मणाली, जें भालवीं लिहिलें असेल तें कधींही चुकणार नाहीं; परंतु तुह्मी मात्र आशिर्वाद देत रहा. वास्तविक हा असा शोक करणें मला मनापासून का बरें वाटतें ? परंतु काय करूं? शहाजादा गेल्यापासून त्याचा आजपर्यंत कांहींच शोध नाहीं, तेव्हां मी तरी कसा धीर धरूं ? असें ह्मणून स्फुंदस्फुंदून जास्तच शोक करूं लागली.

या इष्काची मजा किती विलक्षण आहे पहा ! इकडे

मल्का विरहव्यथेनें झुरणीस लागून मृत्यूच्या जाभाड्यांत पडण्याच्या बेतांत आहे, आणि तिकडे शहाजादा रमणीय बगीच्यांतील आरसे महालांतील अप्सरेसारख्या सौंदर्यकालिकेबरोबर विलास भोगीत पडून राहिला होता. परंतु आशकमाषुकांपैकीं एकाच्या जिवाला जेव्हां अतिशय दुःख होतें, तेव्हां दुसऱ्याचाही जीव बेचैन होउन जातो. सारांष, हा इष्क दोघांच्याही प्राणाचा नाश करणारा आहे. या विषयीं अशी एक गोष्ट आहे कीः—

पुर्वीं एका मोठ्या शहरीं एक कासमखान नांवाचा धनाढ्य सौदागर रहात होता. त्याच्याजवळ सर्व तऱ्हेचा उंची माल नेहमी तयार असे. त्या सौदागराची एक मुलगी अतिशय सौंदर्यवान होती. बहुतेक प्रदेशांत तिच्या अद्वितीय स्वरूपाची कीर्ति पसरल्यामुळें पुष्कळ लोक तिच्या प्राप्तिकरितां झुरत होते. जेव्हां ती संध्याकाळच्या वेळीं हवा खाण्याकारितां फिरावयास निघे, तेव्हां तर दुरस्ता लोकांचे थव्याचे थवे तिची सुरम्य मूर्ति पहाण्याकारितां तटस्थ उभे रहात व ब्रह्मदेवाच्या कौशल्याचीं तारीफ करीत. एके दिवशीं दुसरा एक हैदर नांवाचा तरुण व सुस्वरूप सौदागर माल खरेदी

करण्याकरितां कासमखान सौदागराच्या दुकानीं आला. सौदागराची रूपवती कन्या त्या वेळीं तेथेंच असल्यामुळें तिचें तें अलौकिक सौंदर्य पाहून हैदर सौदागराच्या मनांत पंचशरानें आपलें ठाणें बसविलें. इतकेंच नव्हें, तर त्याची अगदीं वेड्यासारखी स्थिति करून टाकली. ही मदनपुतळी आपणास कशी प्राप्त होते याविषयींचे विचार मनांत येऊन तो काव-याबाव-यासारखा होऊन गेला. तथापि लज्जेमुळें व हें आपलें वर्तन सौदागरच्या नजरेस न यावें ह्मणून कांहीं माल खरेदी करून तो निघून गेला. त्या दिवसापासून हैदर सौदागरानें नित्य माल खरेदीच्या मिशानें कासम सौदागराच्या दुकानीं जाण्याचा परिपाठ ठेविला.

प्रीति ह्मणून जी वस्तु आहे ती कधींही छपून रहात नाहीं. हैदर सौदागराचें नित्य माल खरेदीच्या बहाण्यानें येणें, व आपल्या मुलीला पाहून त्याचें वर्तन, या गोष्टी कासम सौदागराच्या मनांत येऊन त्यानें त्यास आपल्या दुकानीं येण्याचा प्रतिबंध केला. तेव्हां तर हैदराची स्थिति अगदींच वेड्यासारखी होऊन गेली ज्जिच्यावर त्याचें प्रेम जडलें होतें, तिचा मुख द्र

नजरेस पडण्याचें बंद झाल्यामुळें व ही गोष्ट तिच्या बापाला कळली ह्मणून लज्जेनें हैदर अतिशय झुरणीस लागून शेवटीं तो अगदीं आंथरुणास खिळून गेला. सौदागरकन्येच्या ध्यासामुळें त्याला अन्नपाणी वगैरे कांहींच गोड लागेना. अशी स्थिति पाहून त्याच्या एका प्रिय मित्रास अतिशय वाईट वाटलें. तो ह्मणाला, स्त्रियांच्या मोहपाशांत सांपडून व्यर्थ मृत्युमुखीं कां पडतोस? या तुझ्या कृत्यापासून कांहीं फायदा न होतां उलट अब्रूची मात्र हानी होईल. आपल्या पायांवर आपणच होऊन कधींही कुऱ्हाड मारून घेऊं नये. ह्या स्त्रिया साहसी, निर्दय व घातकी असतात. तूं जिच्यावर प्रेम ठेवून इतक्या झुरणीस लागला आहेस, तिचें तुझ्यावर प्रेम आहे किंवा दुसऱ्याच कोणावर जडलें आहे हें तुला काय ठाऊक आहे? अरे, या स्त्रीजातीचा कोणीही भरंवसा धरूं नये. जर तूं महंमद सावकार पुत्राची गोष्ट ऐकशील, तर मला वाटतें या स्त्रिया कशा असतात हें तुला कळेल. हैदर सौदागरानें ती गोष्ट ऐकण्याची आपली इच्छा दर्शविल्यावरून त्याचा मित्र सांगूं लागला:—

## महंमद सावकारपुत्राची गोष्ट.

पूर्वी अलीहुसेन या नांवाचा एक मोठा सावकार होता. त्याचा अनेक देशांशीं मोठा व्यापार असे. तो मोठा धूर्त व व्यवहारदक्ष असे, त्यामुळें सर्व लोकांत त्याची मानमान्यता होती. त्याच्या वयाच्या ७९ व्या वर्षी त्यास एक सुस्वरूप पुत्र झाला. तो बारा वर्षांच्या वयाचा होईपर्यंत सर्व विद्या शिकून तयार झाल्यावर अनेक देश पहाण्याची इच्छा त्याच्या मनांत उद्भवून त्यानें तो विचार बापास सांगितला. अलीहुसेनाच्या मनांत मुलानें देशाटणास जावें असें नव्हतें. परंतु त्याचा अतिशय दुराग्रह पाहून त्यानें कांहीं चाकर नोकर बरोबर देऊन घरचेंच एक जहाज परदेशीं माल घेऊन जावयाचें होतें त्यावर त्याची रवानगी केली. सुमारें दोन महिनेंपर्यंत अफाट समुद्रांतून प्रवास करीत असतां एके दिवशीं एकाएकीं वादळ होऊन त्यांचें जहाज एका खडकावर आपटून फुटलें. त्या वेळीं सर्व मालाची वाताहात होऊन गलबतावरील मनुष्यांचीही तशीच स्थिति झाली. सावकारपुत्र महंमद यास मात्र एका फळ्याचा आश्रय मिळाल्यामुळें तो जिवंत राहिला. पुढें तो त्या फळ्याच्या आश्रयानें वहात

वहात दुसरे दिवशीं सकाळीं किनाऱ्यास लागला. नंतर परमेश्वरकृपेनें वांचल्याबद्दल त्याचे अनन्यभावें उपकार मानून तो पायांत चालण्याची शक्ति नव्हती तरी तसाच रखडत चालला. थोडक्याच वेळांत एक नगर दृष्टीस पडल्यावरून महंमद सावकारपुत्रास अतिशय आनंद होऊन तो तेथपर्यंत गेला; परंतु एवढें मोठें अफाट शहर असून येथें एकही मनुष्य नाहीं हें पाहून तो अगदीं आश्चर्यचकित झाला. तथापि हा काय चमत्कार आहे तो पहावा या उद्देशानें सावकारपुत्र तसाच चालला असतां, कांहीं वेळानें एक सुंदर व ज्यामध्यें अनेक प्रकारचे वृक्ष फलाफुलांनीं भरले आहेत असा बगीचा त्याच्या दृष्टीस पडला. तो पाहून येथें कोणीतरी मनुष्य असेल अशा उद्देशानें महंमद सावकारपुत्र आंत शिरला. त्या बागेमध्यें ज्यावर हिरे माणकांनें जडावकाम केलें आहे असा एक बंगला होता. सावकार पुत्र त्या बंगल्यांत शिरून मुख्य दिवाणखान्यांत जाऊन पहातो, तों एका रत्नखचित पलंगावर एक स्त्री स्वस्थ निजली असून तिच्याशिवाय तेथें दुसरें कोणीही नव्हतें. सावकारपुत्रानें बेधडक पलंगाजवळ

जाऊन त्या स्त्रिच्या अंगावरील शेला ओढला. तेव्हां ती जागी होऊन सावकारपुत्रास ह्मणाली, हे तरुण पुरुषा, व्यर्थ आपला जीव धोक्यांत घालण्याकरितां येथें कां आलास? अजून संध्याकाळ झाली नाहीं तोंच हें नगर सोडून चालता हो; नाहीं तर प्राणास मुकशील. महंमद सावकारपुत्र ह्मणाला, प्रथम तूं कोण आहेस? व हें नगर असें ओसाड कां? हें मला सांग. स्त्री ह्मणाली, पहिल्यानें तूंच आपली हकीगत सांग. महंमद ह्मणाला, मला जर तूं कांहीं अन्न खावयास देशील तर ठीक होईल. कारण आज दोन तीन दिवसांत अन्नाचा लवलेशही पोटांत गेला नसल्यामुळें माझ्यानें एक शब्दही बोलवत नाहीं. ती स्त्री ह्मणाली, आज पुष्कळ दिवसांनीं मीं अन्नाचें नांव ऐकलें. वास्तविक ह्मणशील तर या ठिकाणीं दुःख हें अन्न व अश्रुधारा हें पाणी यां शिवाय माझा दुसरा कांहींच आहार नाहीं. वारंवार माझें मलाच आश्चर्य वाटतें कीं, इतके दिवस मी अन्नपाण्याशिवाय कशी राहिल्यें! परंतु करायचें काय? प्राण असा दुष्ट आहे कीं, तोही कुडी सोडून जातच नाहीं. तुला जर भुक लागली आहे तर ह्या बगीच्या

मध्यें जा व आवडतील तीं फळें लागतील तितकीं खा. महंमद सावकारपुत्र तें ऐकून बागेंत गेला आणि मनास वाटतील तितकीं फळें खाऊन क्षुधा शांत करून त्या स्त्रीजवळ आला. नंतर त्यानें आपला सर्व वृत्तान्त तिला सांगितल्यावर ती ह्मणाली:--मी ह्या नगराच्या बादशहाची कन्या आहें. मला लहानपणापासून शिकारीचा अतिशय नाद असल्यामुळें एके दिवशीं मी आपल्या मैत्रिणीस बरोबर घेऊन नदीकिनारीं फिरत असतां एका प्रचंड सापानें येऊन माझ्या पायास मिठी मारली. तेव्हां मीं धैर्य धरून त्यास एक बाण मारला. तो बाण त्या सर्पास लागला किंवा नाहीं तें कांहीं मला ठाऊक नाहीं. पण तो झटदिशीं तिरमिरीनें विळखा सोडून कांहीं अंतरावर धांवत गेला; व पुन्हां पहिल्यापेक्षां विशाळ रूप धारण करून त्वेषानें माझ्या अंगावर धांवला. त्या बरोबर मीतीनें तावडतोब चलाखी करून मी फटदिशीं आपल्या घोड्यावर स्वार होऊन निघून गेलें; परंतु माझ्या मैत्रिणीस मात्र त्या अजगरानें खाऊन टाकलें. यानंतर या बलाढ्य सर्पानें एक दोन दिवसांत यःकश्चित प्राण्यापासून तों तहत बादशहापर्यंत एक

एक प्राण्यांस खाऊन टाकून सर्व नगर ओस पाडलें. फक्त मी मात्र एकटी जिवंत राहिल्यें आहें. तो सर्प नित्य संध्याकाळीं येथें येऊन दोन घटका बसून गुप्त होतो. त्यामुळें भीतीनें मी रात्रंदिवस झुरणीस लागल्यें आहें. ही माझ्या कर्माची हकीगत मीं तुला सांगितली; आतां यांतून तो ईश्वर कधीं सोडवील तें खरें.

त्या स्त्रिचें हें भाषण ऐकून महंमद ह्मणाला, तूं धीर धर; मी आजच त्या दुष्ट सर्पास ठार मारतों. असें ह्मणून तो तेथून निघून किल्ल्यांत गेला आणि तेथून सुरुंगाची दारू आणून सर्पाच्या बसण्याच्या जागेवर पुरून त्यानें तेथें सुंदर बिछाईत घातली आणि आपण एका कोंपऱ्यांत जाऊन लपून बसला. नित्याच्या वेळीं सर्प येऊन मोठ्या आनंदानें त्या बिछाईतीवर बसला, त्याबरोबर सावकार पुत्रानें सुरुंगाची रंजूक पेटवून दिली; त्यासरसा दारु ठासून भरली असल्यामुळें मोठा आवाज होऊन त्या सर्पाच्या चिंधड्या उडून गेल्या. सावकार पुत्र महंमदाचें हें कृत्य पाहून शहाजादीस मोठा आनंद झाला. या नंतर तीं उभयतां सात वर्षेंपर्यंत प्रेमानें तेथें राहिलीं. तितक्या मुदतींत

शहाजादीस महंमदापासून दोन मुळगे झाले. पुढें एके दिवशीं ती सावकारपुत्रास ह्मणाली, येथें एकटें राहून दिवस कंठणें मला आवडत नाहीं ; या करितां हें नगर पुन्हां वसविण्याची कांहीं तरी तजवीज केली पाहिजे. महंमद ह्मणाला. जर मी घरीं जाऊन आपल्या बापाला घेऊन येईन तर तो हें नगर पूर्वींप्रमाणें करील. शहाजादी ह्मणाली, तुह्मी गेल्यावर मला एकटीला कसें चैन पडेल? मीही तुमच्याबरोबर येतें. सावकार पुत्रानें ठीक आहे, चल, असें ह्मणतांच तीं दोघें एकेका पुत्रास बरोबर घेऊन व कांहीं उपहाराचें साहित्य घेऊन तेथून निघून समुद्रकिनारीं आलीं. त्या ठिकाणीं पुष्कळ लहान मोठीं तारवें पूर्वींच्या लोकवस्तीच्या व्यवहारापैकीं पडलीं होतीं, त्यांपैकीं एका लहानशा तारवावर तीं उभयतां चढलीं. इतक्यांत शहाजादी ह्मणाली—अरेरे माझी एक प्रीतीची वस्तु राहिली आहे ; तिच्यावांचून मला एक क्षणही चैन पडणार नाहीं. जर आपला हुकूम होईल तर तावडतोब जाऊन घेऊन येतें. सावकार पुत्रास त्या स्त्रिचें कपट काय माहीत? त्यानें तिला जलदकर घेऊन ये असें सांगितलें. त्यासरशी ती एक मुलास कडेवर घेऊन झटकन खालीं उतरली आणि

तिनें तें तारूं जोरानें समुद्रांत लोटलें. कर्माची गति किती विचित्र आहे पहा! शहाजादीनें तारवास धक्का देतांच दैवाच्या प्रतिकूलतेनें तें इतक्या जोरानें चालूं लागलें कीं, हां हां ह्मणतां सुमारें दोन कोशपर्यंत समुद्रांत निघून गेलें. सावकारपुत्र महंमद आपल्याकडून होईल तितका प्रयत्न करून तें आंवरीत होता; परंतु तें न थांबतां शेवटीं एका खडकावर आदळून फुटलें. त्या वेळीं महंमद सावकारपुत्राची व त्याजजवळ असलेल्या मुलाची इतीश्रीच व्हावयाची; पण पुढें आणखी दुःख भोगणें त्यांच्या कपाळीं होतें ह्मणूनच ते पिता पुत्र खडकाच्या आश्रयानें जिवंत राहिले.

या गोष्टीस फारसा वेळ झाला नाहीं तोंच एक मोठें थोरलें जहाज त्या खडकापासून थोडक्या अंतरानें चाललें होतें. त्या जहाजावरील मुख्य मालकाच्या दृष्टीस सावकारपुत्र महंमद व त्याचा पुत्र पडल्यामुळें हीं कोणींतरी तुफानांत सांपडलेलीं मनुष्यें असावींत अशा समजुतीनें त्यांस सहाय्य करण्याकरितां त्या मालकानें एक होडी घेऊन जाऊन उभयतां पितापुत्रास घेऊन येण्याची नावाड्यांस आज्ञा केली. थोडक्याच वेळांत आज्ञेप्रमाणें नावाड्यांनीं महंमदास

व त्याच्या पुत्रास जहाजावर आणल्यानंतर मालकानें त्यांची चवकशी केली. त्यांत महंमदाचा बाप आपला स्नेही आहे असें समजल्यावर तर त्यास अतिशय आनंद झाला. यानंतर दोन चार दिवसांनीं तें गलबत सुरक्षितपणें महंमदाच्या गांवीं जाऊन पोहोंचलें. तेव्हां आपला पुत्र सुरक्षितपणें एका पुत्रासह प्रवास करून आला हें पाहून अलीहुसेन सावकारास अत्यानंद झाला. परंतु महंमदानें जेव्हां आपल्या प्रवासाची संपूर्ण हकीगत सांगितली व तें ओसाड नगर वसविण्यास चलण्याविषयीं बापास आग्रह केला तेव्हां मात्र त्यास अतिशय वाईट वाटलें. मुलानें हा हट्ट सोडावा व आपल्या वृद्धापकाळीं त्यानें कोठेंही जावूं नये. ह्मणून अलीहुसेनानें त्याला पुष्कळ उपदेश केला; आणि जर तूं माझें न ऐकतां जाशील, तर तुझ्यावर प्राणांतिक एखादें संकट गुजरेल असेंही सांगितलें. परंतु तो कांहीं केल्या ऐकेना व आपला हट्ट सोडिना. शेवटीं जेव्हां तो आपल्या प्रियेचें शहर वसविण्याकरितां व तिजसमागमें आनंदानें कालक्षेप करण्याकरितां मुलासह जावयास निघाला, तेव्हां तो धूर्त व शहाणा अलिहुसेन पुढील भविष्य जाणून त्याज-

बरोबर निघाला. नंतर एका गलबतांत बसून त्रिवर्ग निघाले ते थोडक्याच दिवसांत इच्छित स्थळीं जाऊन पोहोंचले. परंतु तेथील एकंदर व्यवस्था पाहून महंमदास आपण ठिकाण चुकलों असें वाटलें. कारण, ज्या वेळीं तो गेला त्या वेळीं तें नगर ओसाड असून ह्या वेळीं तें शहर लोकव्यवहारानें अगदीं गजबजून गेलें होतें. हा प्रकार पाहून महंमद अगदीं भांबावून गेला. नंतर त्यानें तेथील एका मनुष्यास ह्या शहराचें नांव काय? व येथें कोण राज्य करितो? असें विचारलें. तेव्हां तो ह्मणाला, हें नगर पूर्वीं ओसाड होतें; परंतु थोडक्याच दिवसांपूर्वीं एथील शहाजादीनें एका राजपुत्राबरोबर विवाह करून हें नगर बसविलें. हें ऐकून महंमदास एका प्रकारचा त्वेष व दुःख होऊन तो अगदीं वेड्यासारखा झाला. तेव्हां अलिहुसेन ह्मणाला, बेटा, आतां येथें रहाण्यांत कांहीं अर्थ नाहीं; आलों तसेंच परत जावें हें बरें. महंमद ह्मणाला, जिच्याकरितां मीं एवढे श्रम घेतले ती जरी बेइमान झाली, तरी एक वेळ तिची भेट घेऊन दोन गोष्टी बोलल्याशिवाय मी कधींही परत येणार नाहीं. अलिहुसेन ह्मणाला, अरे, तुला वेड तर नाहीं लागलें! जोंपर्यंत तूं तिच्याजवळ होतास तोंपर्यंतच

तिचें तुझ्यावर प्रेम होतें. या स्त्रियांचा विश्वास शहाण्या मनुष्यानें कधींही धरूं नये. एकाकडे नुमतेंच पहाणें, एकाकडे पाहून हंसणें, एकाचें ध्यान करणें व एकावर प्रीति करणें असा चंचलपणाचा स्त्रियांचा स्वाभाविक धर्म असल्यामुळें शहाजादीनें दुसऱ्या मनुष्याबरोबर विवाह केला यांत नवल तें काय? जोंपर्यंत स्त्री आपल्या डोळ्यासमोर असेल, तोंपर्यंतच ती आपली असें ह्मणावें. एवढ्या करितां तूं आपला हेका सोड व आलास तसा परत चल. नाहीं तर व्यर्थ संकटांत मात्र पडशील. महंमदानें हें बापाचें सांगणें न ऐकून शहाजादी कधीं फिरण्यास निघते कीं काय? असें एका मनुष्यास विचारलें. तो ह्मणाला, तिचा प्रतिदिवशीं संध्याकाळीं सहल करावयास निघण्याचा निश्चयाचाच परिपाठ आहे. इतकें ऐकल्यावर ते त्रिवर्ग एका धर्मशाळेंत जाऊन उतरले. नंतर संध्याकाळीं महंमद पुत्रास बरोबर घेऊन शहाजादी फिरण्यास निघण्याच्या वाटेवर जाऊन उभा राहिला असतां नित्याप्रमाणें शहाजादी घोड्यावर स्वार होऊन सहल करावयास निघाली. तेव्हां महंमद ओरडून ह्मणाला,—हे प्रिये, तुला सांगितल्याप्रमाणें मीं आपलें वचन पुरें केलें व

बापास बरोबर घेऊन मुलासह सुखरूप आलों. आतां तूं काय आज्ञा करतेस तें सांग. शहाजादी हें ऐकून जशी काय ओळखदेखही नाहीं अशा तिऱ्हाइती बाण्यानें एक शब्दही न बोलतां निघून गेली. महंमदही हें तिचें कृत्य पाहून अतिशय दुःखी होऊन परत मकाणावर आला. अलिहुसेनानें काय झालें ह्मणून विचारलें, तेव्हां महंमदानें झालेली सर्व हकीगत सांगितली. ती ऐकून अलिहुसेन ह्मणाला, अजून तरी हें स्त्रीचरित्र ओळखून सावध हो व परत घरीं चल; नाहीं तर व्यर्थ दुःख पावशील. ह्या स्त्रिया दिसण्यांत जरी मोहक भासतात तरी त्या साक्षात काळ होत. ह्यांच्या चरित्राचा पत्ता अद्याप कोणालाही लागला नाहीं. तेव्हां मी सांगतों ह्याकडे नीट लक्ष देऊन जें करणें तें कर. अलिहुसेनानें इतकें जरी सांगितलें, तरी महंमदास तें न रुचून दुसरे दिवशीं शहाजादी फिरावयास निघण्याच्या वेळेवर तो राजवाड्याजवळ गेला. थोड्याच वेळांत ती नियमाप्रमाणें घोड्यावर बसून सहल करावयास निघाली. तेव्हां महंमद तिच्या घोड्याची लगाम धरून धांवूं लागला आणि ह्मणाला,—प्रिये, पूर्वीं तुझी माझी प्रीति कशी होती? तुझ्याकरितां मीं किती श्रम करून त्या अजगराला

मारलें? वगैरे गोष्टी लक्षांत आण. अगे, ज्या तुला माझ्यावांचून एक क्षणही करमत नव्हतें, व उभयतांचा समागम आजन्म असावा अशी जी तुझी इच्छा ती एकदम कशी मावळली? तुला एकटीला चैन पडेना ह्मणूनच मी हें नगर वसविण्याकरितां आपल्या बापाला घेऊन येण्यासाठीं गेलों; व त्याप्रमाणें त्यास घेऊनही आलों. परंतु तितक्या अवकाशांत तूं बेइमानपणानें वागलीस आणि नुसती ओळख सुद्धां देत नाहींस याला काय ह्मणावें? महंमदाचें हें भाषण ऐकतांच शहाजादीनें कांहीं एक भाषण न करितां कमरेचा तमंचा काढून महंमदावर फेंकला व घोडा उधळून निघून गेली.

शहाजादीचें हें कृत्य पाहून महंमद दुःखत्वेषानें बिऱ्हाडीं आला व ती हकीकत त्यानें बापास सांगितली. अलिहुसेनानेंही त्यास आणखी बराच उपदेश केला; परंतु उद्यां एक वेळ शहाजादीची भेट घेऊन काय तो निकाल करावयाचा असा महंमदानें निश्चय केला. दुसरे दिवशीं शहाजादी फिरावयास निघण्याच्या वेळेवर महंमद व त्याचा बाप असे दोघेही राजवाड्याजवळ गेले व ती येतांच महंमदानें घोडा

धरला. तेव्हां ती अलिहुसेनास ह्मणाली. तुमच्या मुलाच्या सांगण्यावरून मी असें समजत होतें कीं, आपण मोठे विचारी, धूर्त, व अनुभवशीर आहां; परंतु तो माझा समज आतां दूर झाला. अहो, 'चालत्या घोड्याच्या गोमाशा' ही ह्मण तुझाला माहीत नाहीं काय? तद्वतच सारी स्थिति समजा! आमच्या स्त्रियांचा हा नियमच आहे कीं, त्या एकावर कधींही सारखी प्रीति ठेवावयाच्या नाहींत. काल जी गोष्ट झाली तिचें स्मरण कोणीं ठेवावें? रोज हजारों उलाढाली व्हावयाच्या हा जगाचाच जर नियम आहे, तर आह्मी तरी सर्वदां एकच गोष्ट लक्षांत कशी ठेवावी. ज्या वेळीं तुझा पुत्र हें नगर सोडून गेला, त्याच वेळीं त्याजविषयींची प्रीति माझ्या हृदयांतून निघून गेली. यांत सर्व गोष्टी समजा! असें ह्मणून ती घोड्यास टांच लावून निघून गेली. यानंतर ते त्रिवर्ग मुक्काम्यानें परत आपल्या देशीं आले; परंतु त्या दिवसापासून महंमद मात्र सर्वसंग परित्याग करून वनवाशासारखा बनला व शेवटीं त्या स्थितींतच हा लोक सोडून परलोकीं निघून गेला.

इतकी गोष्ट सांगून हेदर सौदागराचा मित्र ह्मणाला, या स्त्रियांच्या मोहपाशांत शहाण्यानें कधींही गुंतूं नये.

कारण, त्यापासून शेवटीं दुःख झाल्याशिवाय कधींही रहाणार नाहीं. हें त्याचें भाषण ऐकून हैदरसौदागर ह्मणाला, तूं सांगतोस या सर्व गोष्टी मला समजतात; परंतु एक वेळ प्रेमजालांत गुंतून गेलेलें मन मी आपल्याकडून पुष्कळ यत्न करितों तरी ताळ्यावर येत नाहीं, त्यामुळें माझा नाइलाज झाला आहे. असो. आतां सांगावयाचें इतकेंच कीं, प्रत्येक मनुष्याला केव्हांनाकेव्हां तरी मरावयाचें आहेच; त्यामुळें मी त्याची बिलकूल पर्वा करीत नाहीं. परंतु एक इच्छा आहे, ती मात्र तुह्मी मित्रांनीं पूर्ण केली पाहिजे. आतां ती कोणची ह्मणाल तर, उदईक मी हें जग सोडून खास जाणार. तेव्हां माझें प्रेत सर्व इष्टमित्रांनीं मोठ्या इतमामानें वाजत गाजत माझ्या प्रिय माशुकेच्या दारावरून दर्ग्यांत न्यावें. हें ऐकून त्याच्या सर्व मित्रमंडळीस अतिशय वाईट वाटलें. पुढें त्याच रात्रीं हैदर हा परलोकवासी झाला. व दुसरे दिवशीं सकाळींच कासम सौदागराच्या मुलीच्या सौंदर्यावर लुब्ध होऊन हैदर सौदागर मरण पावला अशी सर्व शहरभ[र] बातमी पसरली व ती त्या सौंदर्यलतिकेच्या कानावरह[ी] गेली. तेव्हां तिला अतिशय दुःख होऊन आपल्याकरि[तां]

हा एवढा अनर्थ घडला त्यापेक्षां ह्या जगांत राहूं नये असें तिला वाटूं लागलें, व ती आपल्या सौंदर्याचा धिःकार करूं लागली. नंतर हैदराच्या मित्रांनीं जेव्हां त्याचें प्रेत त्याच्या इच्छेप्रमाणें कासम सौदागराच्या घरावरून कबरस्तानांत नेलें, तेव्हां ती सौदागर कन्याही लोकांच्या गर्दीबरोबर कबरस्थानांत गेली; आणि एकाएकीं हैदर सौदागराच्या प्रेतास मिठी मारून तिनें एक मोठी किंकाळी फोडून आपला प्राण सोडला.

तात्पर्य, आपुक माषुकांच्यांत जर खरी प्रीति वसत असली, तर त्यांपैकीं एकाला जर दुःख झालें, तर दुसऱ्यालाही दुःख झाल्याशिवाय कधींही रहाणार नाहीं. त्याप्रमाणेंच तिकडे मल्का शहाजादीची स्थिति झाली होती.

मृत्युतुल्य वह हो गई, सुधिबुद्धि रहित देह ॥
पिया पिया निशिदिनीं करत, पियासों लागे नेह ॥

जानआलम शहाजाद्याला जाऊन पुष्कळ दिवस झाले तरी त्याचा कांहींच शोधसमाचार कळला नव्हता, त्या विरहदुःखानें मल्का शहाजादी रात्रंदिवस शोक करीत राहिली होती. तसेंच अन्नपाणी व सुखविलास अगदींच सोडल्यामुळें ती अगदीं सुकून गेली होती

मी आहे कोठें? करतें काय? याचें तर तिला मुळींच भान नसून रात्रंदिवस ती जानआलमच्या वाटेकडे डोळे लाऊन होती. अशी तिची स्थिति झाल्यामुळें तिकडे जानआलम शहाजाद्यासही चैन पडेनासें झालें. त्यास वारंवार मल्का शहाजादीची आठवण होऊं लागली. इच्छित हेतू पूर्ण झाल्याबरोबर निघून येतों असें वचन दिलें असून त्याप्रमाणें परमेश्वरकृपेनें मनकामना पूर्ण झाली असतांही येथें सुखविलास भोगीत पडलों आहों, आणि तिकडे ती बिचारी विरहाग्नीनें अगदीं करपून जाऊन चातकाप्रमाणें माझ्या वाटेकडे डोळे लावून बसली असेल, तेव्हां आतां फार दिवस येथें राहूं नये; असा विचार मनांत येतांच त्यानें गुलछब्रूस सांगितलें कीं, मला घर सोडून पुष्कळ दिवस झाल्यामुळें तिकडे आईबाप काळजी करीत असतील; याकरितां मला आपल्या शहरीं लौकरच गेलें पाहिजे. तेव्हां गुलछब्रूनें हें ठीक आहे; माझीही तयारी आहे असें सांगितलें. नंतर दुसरे दिवशीं आपली इच्छा त्यानें सासऱ्यास कळविली तेव्हां तो ह्मणाला, मी तुला जाण्याला कधींही अनुमोदन देणार नाहीं. शहाजादा नम्रतेनें ह्मणाला, मला येथें येऊन पुरें एक वर्षही झालें नाहीं; ति-

तक्या अवधींत तुमची माझ्यावर इतकी प्रीति जडली कीं, तुम्ही मला आपला जीव कीं प्राण समजतां. परंतु ज्यांच्या उदरीं माझें जन्न झालें असून मी सोळा–सत्रा वर्षांचा होईपर्यंत ज्यांनीं मोठ्या प्रेमानें लालनपालन केलें त्यांची अवस्था काय होत असेल बरें? घर सोडल्यापासून आजपर्यंत कांहींच शोधसमाचार न कळल्यामुळें तीं अगदीं झुरणीस लागलीं असतील. तसेंच आपल्या आईबापांस दुःखावस्थेंत ठेवून आपण सुखविलास भोगीत रहावें हाही पुत्राचा धर्म नव्हे. याकरितां मला आतां जाण्यास अडथळा करूं नका. जानआलमनें हें भाषण ऐकून गुलछबूचा बाप ह्मणाला, तुझी जर इच्छाच आहे, तर माझ्याकडून कांहीं हरकत नाहीं; परंतु फार लांबीचा प्रवास असल्यामुळें मार्गक्रमणाची तयारी करण्यास चाळीस दिवस लागतील. हें ऐकून ठीक आहे असें ह्मणून शहाजादा आपल्या महालीं निघून गेला.

# प्रकरण ८ वें.

---

चाळीस दिवसांत शहाजाद्याच्या मार्गक्रमणाची सर्व तयारी झाल्यावर, गुलछबूच्या बापानें सर्व नगर व नगरापासून दोन कोश पर्यंतचा मार्ग शृंगारण्याचा हुकूम केला; आणि चार दिवसपर्यंत सर्व नगरवासी जनांस मेजवान्या देऊन लाखों रुपयांचा दानधर्म केला. नंतर ज्या दिवशीं जानआलम शहाजादा आपल्या प्रिय गुलछबूसह तें नगर सोडून निघणार, त्या दिवशीं पांच वर्षांच्या मुलापासून तों पंचाण्णव वर्षांच्या म्हाताऱ्यापर्यंत सर्वांनीं शहाजाद्यास पोंचविण्यास नगरापासून दोन कोशपर्यंत यावें असा बादशहानें हुकूम फर्माविला. शहाजाद्याचा प्रवास घोर अरण्यांतून असल्यामुळें संरक्षणाकरितां लावलष्कर व शुश्रुषेकरितां दासदासी वगैरे लाखों मनुष्यें त्याजबरोबर दिलीं होतीं. हत्ती, घोडे वगैरे किती दिले होते यांची तर गणतीच नव्हती. तसेंच अगणित द्रव्य, हिरे माणकांचे मौल्यवान अलंकार, नाना तऱ्हेचे भरजरी पोषाख वगैरे किती आंदण होतें याचा तर पत्ताच नव्हता. सारांष सार्वभौम राजास योग्य अशी जामाताच्या व

प्रिय कन्येच्या बोळवणयाची सर्व तयारी झाल्यावर शुभमुहूर्ती सर्वांचा निरोप घेऊन जानआलम शहाजादा, गुलछबु हीं रथांत बसलीं. कन्या आपल्या सासरीं जावयाची असली आणि घरांत जरी उमी, रखी, नान्या, गोंद्या वगैरे मुलांची रेलचेल असली, तथापि आईबापांस दुःख झाल्यावांचून रहात नाहीं. इतकेंच नव्हे, तर कन्या मानून लालनपालन केलेल्या सर्वसंगपरित्यागी अशा अरण्यवासी तापशांसही वियोगजन्य दुःखाचे उमाळे आल्यावांचून रहात नाहींत; तर मग सार्वभौम राजाची एकुलती एक प्रिय मुलगी लांबीच्या पल्ल्यावर श्वशुरगृहीं जावयास निघाली असतां गुलछबूच्या आईबापांस किती दुःख झालें असेल यांचें वर्णन करणेंही अशक्य होय. तथापि मुलगी ही सासरीं जावयाची अशी तर समजूत आईबापाच्या मनांत खिळून गेली असल्यामुळें, त्यांनीं आपल्या विरहदुःखाचें आकलन करून शहाजाद्यास व गुलछबूस मोठ्या आनंदानें जावयास निरोप दिला. नंतर मंगलवाद्यांनीं व सर्व प्रकारच्या शुभ चिन्हांनीं युक्त अशी स्वारी निघाली असतां बादशहा आदिकरून सर्व नगरवासी जन उभयतांस पोंचविण्यास निघाले. नगरांतून जात असतां सर्व ना-

गरीक स्त्रियांनीं शहाजाद्यावर व गुलछबूवर पुष्पवृष्टि केली. अशा थाटानें नगरापासून दोन कोशपर्यंत स्वारी गेल्यावर बादशाहा व नगरवासी जन उभयतांचा निरोप घेऊन त्यांचा प्रवास सुखरूपतेनें व्हावा ह्मणून परमेश्वराची प्रार्थना करीत परत फिरले; आणि शहाजादा परिवारासह पुढें मार्ग क्रमूं लागला.

---

## प्रकरण ९ वें.

---

सासऱ्याचा निरोप घेऊन प्रिय गुलछबूसह अफाट परिवारानिशीं जानआलम शहाजादा निघाला, तो मजल मारीत मारीत सुमारें ४० दिवसांनीं मल्का शहाजादीच्या मकाणानजीक येऊन पोहोंचला. हें वर्तमान एका हेरानें येऊन मल्केस सांगितलें; त्याबरोबर तीस मूर्च्छा आली. पुढें कांहीं वेळानें सावध झाल्यावर ह्मणाली, माझें एवढें थोर नशीब कोठें आहे कीं, प्रियकराच्या येण्याची सुवार्ता माझे कानीं येईल! मी जन्माचीच अभागी! असें असतां विनाकारण माझ्या जिवाला तुम्ही त्रास कां देतां? हें ऐकून हेर ह्मणाला, मी सांगतों यांत कधींही अंतर होणार नाहीं. थोड-

क्याच वेळांत ज्या विरहदुःखानें आपली प्रकृति ना-दुरुस्त झाली आहे त्याचें परिमार्जन होईल. इतक्यांत एक दासीही धांवतच येऊन ह्मणाली,- बाईसाहेब, मी आतां आपल्या महालाच्या गच्चीवर उभी होतें तों एक मोठें सैन्य इकडे येत आहे असें माझ्या नजरेस पडलें; त्यावरून मला वाटतें बहुधा शहाजाद्याचीच ती स्वारी येत असावी. हें ऐकतांच मलका मोठ्या आनं-दानें गच्चीवर गेली, तों बागेच्या अगदीं नजीक थबक-लेलें सैन्य तिच्या नजरेस पडलें. इतक्यांत शहाजा-दाही दोन चार लोकांनिशीं घोड्यावर बसून महालाज-वळ आला; व कांहीं एक न बोलतां घोड्यावरून खालीं उतरून मलकेच्या बापाला त्याच्या मठांत जाऊन भे-टला. शहाजाद्यास पहातांच मलकेच्या बापानें मोठ्या प्रेमानें पोटाशी धरिलें आणि आशिर्वाद दिला. इत-क्यांत गुलहस्नूही घोड्यावर स्वार होऊन त्या ठिकाणीं आली व मलकेच्या बापास प्रणाम करून हात जोडून ह्मणाली, आजपर्यंत आपली कीर्ति मी आपल्या बापा-च्या तोंडून ऐकत होतें; परंतु आज ह्या शहाजाद्याच्या कृपेनें आपल्या दर्शनाचा अलभ्य लाभ झाला. मलके-च्या बापानें तिलाही पोटाशीं धरून आशिर्वाद दिला

आणि क्षेमकुशल विचारलें. यानंतर दोन घटका इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर शहाजाद्यानें मलकेच्या भेटीला जाण्याची परवानगी त्याजजवळ मागितली. तेव्हां तो ह्मणाला—बेटा, हें विचारण्याची मुळींच जरूर नाहीं; कारण घर तुझेंच आहे. हें ऐकतांच शहाजादा व गुलछबु तेथून निघून मलकेच्या महालीं आली.

विरहानलानें मलकेची प्रकृति जरी क्षीण झाली होती, तरी जानआलम शहाजाद्याचें मुखकमल दृष्टीस पडतांच तिचा मुखेंदु पूर्ववत प्रफुल्लित होऊन पहिल्यापेक्षां दुप्पट शक्ति आली. शहाजादा महालीं येतांच तिनें मोठ्या प्रेमानें त्याच्या गळ्यांत मिठी मारली, आणि स्फुंदस्फुंदून रडूं लागली. तेव्हां शहाजाद्यानें तिचें शांतवन केलें. नंतर ती गुलछबूच्याही गळ्याला घट्ट मिठी मारून ह्मणाली, तुझ्या येण्यानें मला फारच आनंद झाला असून तो शेवटपर्यंत कायम रहाण्याकरितां तूं नेहमीं माझ्यावर कृपादृष्टि ठेवीत जा. कारण, किती झालें तरी तूं थोर राजकन्या असून मी यःकश्चित फकिराची मुलगी आहें; ह्मणून नेहमीं मला आपलें पादवंदन करणेंच योग्य

आहे. हें ऐकून गुलछबु ह्मणाली, हे माझ्या प्रिय वहिणी, असें भलतेंच बोलणें योग्य नाहीं. कारण, तुझी माझी योग्यता सारखीच आहे. इतकेंच नव्हे तर हिशोबानें पाहिलें असतां पहिला मान तुझाच आहे. याप्रमाणें कांहीं वेळ उभयतांचीं बोलणीं वगैरे झाल्यावर सर्वांनीं मोठ्या प्रेमानें भोजन केलें. नंतर त्या दिवशींची सारी रात्र त्या दोघींनीं आनंदाच्या गोष्टी बोलण्यांत घालविल्यावर दुसरे दिवशीं सकाळीं गुलछबु शहाजाद्याला भेटली आणि ह्मणाली, मल्के-सारखी स्त्री आजपर्यंत मला एकही भेटली नाहीं व ऐकलीही नाहीं. अहाहा! काय तिचें निर्मळ मन व थोर स्वभाव? तिचे जितके गुण वर्णन करावे तितके थोडेच. असो, यानंतर दुसरे दिवशीं जेव्हां शहाजादा गुलछबूसह मल्केच्या बापाच्या भेटीला गेला, तेव्हां त्यानें मल्केसही बोलावून आणलें; आणि शहा-जाद्यास ह्मणाला, जसें तूं आपलें वचन सत्य केलेंस, त्याप्रमाणें मलाही आपलें बोलणें खरें केलें पाहिजे. असें ह्मणून त्यानें ईश्वराच्या नांवानें आपल्या मुलीनें शहाजाद्याबरोबर लग्न लाविलें.

"स्त्रियांना लोण्याचीही रवत सोसत नाहीं" असी

एक ह्मण आहे; परंतु क्वचित ठिकाणीं तीही खोटी ठरते. गुल्छबूची व मल्केची स्थिति त्याप्रमाणेंच होती. शहाजाद्याच्या भेटीचा एकेकीला एकएक दिवस जरी नेमून दिला होता, तरी त्या दोघी कधींही रुसल्या फुगल्या नाहींत. इतकेंच नव्हे, तर दिवसेंदिवस त्यांचें प्रेम अतिशयच वाढत चाललें होतें; त्यामुळें सर्व जग मोठ्या आनंदानें कालक्षेप करीत होतीं.

---

## प्रकरण १० वें.

कांहीं दिवस शहाजादा मल्केच्या महालीं गुल्छबू-सह आनंदोपभोग घेत राहिल्यावर, एके दिवशीं मल्केच्या बापाच्या मठांत मल्का आदिकरून सर्व मंडळी बसली असतां शहाजादा ह्मणाला,—मला घर सोडून पुष्कळ दिवस झाले, तिकडे आईबाप एकसारखे वाटेकडे डोळे लावून असतील; तेव्हां आतां फार दिवस येथें रहातां कामा नये. हें ऐकतांच मल्केचा बाप ह्मणाला, ठीक आहे; माझ्याकडून कांहीं हरकत नाहीं. आतां मल्केच्या जाण्यानें जरी मला दुःख होणार आहे, तरी

'कन्या सासरींच असायाची' ही परंपरागत चालत आलेली रूढी माझ्यानें मोडवणार नाहीं. असें ह्मणून त्यानें आपल्या इतमामा योग्य असा नजराणा, हत्ती, घोडे, दास, दासी वगैरे शहाजाद्यास दिले. यानंतर मार्गक्रमणाची वगैरे सर्व तयारी झाल्यावर जेव्हां तो स्वनगरास जावयास निघाला, तेव्हां आपल्या दोन्ही स्त्रियांसह मल्केच्या बापाचा निरोप घ्यावयास गेला. त्या वेळीं तो शहाजाद्यास ह्मणाला, माझ्यासारख्या फकिराजवळ तुझ्या ऐश्वर्याप्रमाणें देण्याजोगें कांहीं नाहीं. परंतु एक चुटका सांगून ठेवतों, तो जर नीट लक्षांत ठेवशील तर प्रसंगीं मोठ्या उपयोगीं पडेल. त्याच्यापुढें धन दौलत तुच्छ आहे. असें ह्मणून त्यानें शहाजाद्यास एकांतीं नेऊन एक मंत्र कानांत सांगितला. आणि ह्मणाला, हा जर तूं दुसऱ्यास सांगशील तर मोठा घात होईल हें पक्कें लक्षांत ठेव. नंतर तो वृद्ध फकीर गुलछबूजवळ येऊन ह्मणाला, बेटा, ही माझी लाडकी कन्या आजपासून तुझ्या स्वाधीन झाली. आतां हिचा तूं योग्य रीतीनें संभाळ कर. ही तुझें दास्यत्व करून राहील. हें त्याचें भाषण ऐकून गुलछबु नेत्रांत प्रेमाश्रु आणून त्या वृद्ध फकिराच्या पायां पडून म्हणाली,

महाराज, हें आपण काय ह्मणतां? मल्केची व माझी सारखीच योग्यता असून आम्ही दोघी बहिणीप्रमाणें प्रेमानें वागूं; त्याविषयीं आपण बिलकूल काळजी करूं नका. इतका प्रकार इकडे होत आहे, तोंच बाहेर जानआलम शहाजाद्याचा परम मित्र प्रधानपुत्र, जो हरिणाच्या मागें लागून नाहींसा झाला होता तो अकस्मात तेथें आला, आणि शहाजाद्याच्या स्वारींतील लोकांस म्हणाला, तुम्ही कोणाचे लोक आहां? त्यांनीं जानआलम शहाजाद्याचे आम्ही ताबेदार आहों असें सांगितल्यावर प्रधानपुत्रानें आनंदानें शहाजादा कोठें आहे असें विचारलें. त्यांनीं या ठिकाणाचा मालक जो फकीर आहे तो शहाजाद्यास एकांतांत कांहीं उपदेश करीत आहे असें ह्मटलें.

इतकें त्याचें बोलणें होत आहे तोंच शहाजादा उभयतां स्त्रियांसह सामग्र्याचा निरोप घेऊन मठांतून बाहेर पडला. त्याबरोबर वजीरपुत्र धांवत जाऊन त्यास भेटला. शहाजाद्यानेंही त्यास दृढालिंगन दिलें. नंतर ते दोघेही प्रवासाच्या गोष्टी बोलत बोलत मल्केच्या महालांत गेले; व शहाजाद्यानें मल्का व गुल्छब्रु यांस दाखवून सर्व हकीगत सांगून ह्मणाला, तेव्हां प्रा-

रुध प्रतिकूल होतें, तेव्हां घोर जंगलांत तुझी इष्टमित्र सोडून गेलेत: आणि आतां तेंच अनुकूल झाल्यावर इच्छित मनोरथ सिद्धीस जाऊन मित्राचीही भेट झाली. इतकें शहाजादा सांगत आहे तों इकडे प्रधानपुत्र गुलछबूचें सौंदर्य पाहून अंतर्यामीं बेहोष झाला व अशी चंद्रवदना आपणास कोणत्या रीतीनें प्राप्त होईल याविषयीं विचार करूं लागला. असा प्रकार चालला आहे, तोंच प्रधानपुत्रास रहाण्या-करितां सेवकांनीं एक महाल रिकामा करून दिला. नंतर शहाजाद्यानें आपल्या दोन्ही स्त्रि-यांच्या सुस्वरूप दासीस बोलावून आणून प्रधान-पुत्रास सांगितलें कीं, ह्या स्त्रियांपैकीं जी आवडेल तिचा तूं अंगीकार कर. प्रधानपुत्राच्या मनांत कु-वासनेनें पूर्वीच संचार केला होता, तरी तो मोठ्या अदबीनें ह्मणाला, हे शहाजादा, माझी शक्ति या स्त्रियांकडे नुसती डोळे उघडून पहाण्याचीही नाहीं; मग अंगिकाराची गोष्ट कशाला पाहिजे? हें त्याचें निरिच्छपणाचें भाषण ऐकून शहाजादा आनंदित झाला व त्याजविषयीं दृढ विश्वास वाटला. यानंतर पुन्हां गोष्टी सुरू झाल्यावर शहाजादा मलकेच्या बापाच्या

सात्विकतेनें व जादूप्रवीणतेनें वर्णन करितां करितां त्यानें जो एकांतांत उपदेश केला होता, तेथपर्यंत बोलणें आल्याबरोबर शहाजाद्यानें बोलण्याचा ओघ फिरविला. कारण, ती गुप्त गोष्ट कोणासही न सांगण्याविषयीं मल्केच्या बापानें निक्षून सांगितलें होतें. प्रधानपुत्र हा प्रकार तावडतोब समजून गेला. असो.

यानंतर शहाजादा व प्रधानपुत्र रात्रंदिवस एकमेकांस विसंबतनासे झाले. हें पाहून मल्का व गुलछडु यांनीं शहाजाद्यास सांगितलें कीं, हरहमेश तरुण मनुष्यासह महालांत कालक्षेप करणें योग्य नाहीं व राजे लोकांची अशी रीतही नाहीं. शहाजादा रागावून ह्मणाला, प्रधानपुत्राच्या संबंधानें बिलकूल शंका मनांत आणावयास नको. कारण, ज्यानें मी खुषीनें देत असतांही दासीचा अंगिकार केला नाहीं, त्याच्या मनांत तुमच्याविषयीं कधींही पापवासना येणार नाहीं. या नंतर दोघीही शहाजाद्याच्या भोळेपणा संबंधानें कांहीं वेळ टीका करून दोघीही निरुपायास्तव स्वस्थ राहिल्या.

मल्केच्या बापानें शहाजाद्यास जो इल्म सांगितला, तो आपणास कळावा असें प्रधानपुत्राच्या मनांत

इच्छा होती व तो तशी संधि येण्याची वाट पहात होता. पुढें एके दिवशीं संध्याकाळच्या सुमारास मंद वाऱ्याची झुळूक सुटली असतां शहाजाद्यास लहर येऊन तो प्रधानपुत्रास बरोबर घेऊन बागेतील एका चबुतऱ्यावर हवा खात बसला. कांहीं वेळ प्रेमपूर्वक गोष्टी झाल्यावर उभयतांनींही मदिरा प्राशन केली. त्या मद्याची पूर्ण निशा आल्यावर आपला हेतु साध्य होण्यास ही संधी बरी आहे असें पाहून प्रधानपुत्र ह्मणाला, शहाजाद्या, तूं आणि मी जिवलग मित्र. दोघांचे देह जरी भिन्न आहेत, तरी जीव एकच आहे. असें समजणारे, आजपर्यंत कोणतीही गोष्ट एकमेकांनीं एकमेकांस सांगितल्याशिवाय राहिलों नाहीं; पण हल्लीं तुझ्या वृत्तींत फरक पडलेला पाहून मला फार वाईट वाटतें. हें ऐकून शहाजादा ह्मणाला, तुझ्याशीं कोणत्याही गोष्टीची प्रतारणा केलेली मला स्मरत नाहीं; तथापि जें काय असेल तें सांग. तेव्हां प्रधानपुत्र ह्मणाला, दुसरें कांहीं नाहीं; फक्त तुला मलकेच्या बापानें जी विद्या शिकविली आहे ती तूं मला सांगितली नाहीं. हें ऐकून शहाजादा मद्याच्या धुंदींत पुढला मागला विचार न करितां ह्मणाला, मित्रा, तेवढ्या गोष्टी करि-

तो रंजीस होऊं नकोस. मलकेच्या बापानें मला पर-
काया प्रवेशाची विद्या शिकविली आहे या शिवाय
दुसरें कांहीं नाहीं. प्रधानपुत्र आश्चर्य वाटल्यासारखें
दाखवून ह्मणाला, दुसऱ्याच्या शरिरांत कसा प्रवेश
करावयाचा हें जर तूं मला स्पष्टपणें सांगशील, तर मा-
झ्या माशंक वृत्तीचें निरसन होईल. शहाजाद्यानें
झाही वेळीं विचार न करितां तो इलम प्रधानपुत्रास
सांगितला. तो ऐकून आपल्यास पूर्ण अवगत झाला
असें पाहून प्रधानपुत्र ह्मणाला, मित्रा, हें सर्व शाब्दिक
ज्ञान सांगितलेंस. यापेक्षां प्रत्यक्ष क्रिया करून जर
दाखविशील तर मात्र माझें समाधान होईल. हें ऐकून
शहाजादा प्रधानपुत्रास बरोबर घेऊन जंगलांत गेला.
तेथें एक हरिणाचें प्रेत पडलें होतें तें पाहून शहाजादा
ह्मणाला, मित्रा, आतां मी या हरिणाच्या शरिरांत
प्रवेश करितों पहा. असें ह्मणून तो त्याच्या शरिरांत
शिरला, त्याबरोबर हरिणाचें प्रेत सजीव झालें व श-
हाजाद्याचें प्रेत निर्जिव होऊन जमिनीवर पडलें. प्रधान-
पुत्रास ती विद्या अवगत झाली असल्यामुळें त्यानें
तावडतोब शहाजाद्याच्या शरिरांत प्रवेश केला आणि
तरवारीनें आपल्या पूर्वीच्या शरिराचे तुकडे तुकडे क

रून टाकले हा सर्व प्रकार पहातांच शहाजाद्याची निशा उतरून तो शुद्धीवर आला व आपण होऊन आपल्या पायांवर कुऱ्हाड मारून घेतल्याबद्दल पश्चात्ताप करूं लागला. परंतु इतक्यांत प्रधानपुत्र त्यासही मारण्याकरितां धांवल्यामुळें विचारा हरीण रूप पावलेला शहाजादा तेथून पळून एका झाडींत लपून राहिला. नंतर प्रधानपुत्रानें आपल्या पोषाखा-वर रक्ताचे डाग उडवून घेतले आणि परत महालीं ये-ऊन मल्केस म्हणाला, आज मोठा गहजब उडाला. मी प्रधानपुत्रास बरोबर घेउन शिकारीस गेलों असतां अ-कस्मात एक वाघ आला व प्रधानपुत्रास अचानक तों-डांत धरून जाऊं लागला. मीं त्यास सोडविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण त्यापासून कांहींच उपयोग झाला नाहीं. हें ऐकून मल्का दुःख करून म्हणाली, बिचाऱ्याच्या नशिबीं अशा रीतीनें मृत्यु यावा असें लिहिलें होतें त्याला उपाय काय? असो, ईश्वराची मर्जी !! नंतर प्रधानपुत्र थोडासा कृत्रिम शोक करून तेथून निघून गुलछबूच्या महालीं आला, व मल्केप्र-माणें तिलाही सर्व हकीगत सांगून बाबरेपणानें तेथून निघून गेला.

कांहीं वेळानें मल्का व गुलछबु एके ठिकाणीं भेटल्यावर दोघींनीं प्रधानपुत्राच्या मरणासंबंधानें आश्चर्य—दुःखोद्गार काढले. तेव्हां मल्का ह्मणाली, परमेश्वराच्या मनांत काय आहे समजत नाहीं; पण आज सकाळपासून मारीच अपशकुन होत आहेत. क्षणोक्षणीं उजवा नेत्र लवतो; क्षणांत भीतिप्रद देखावे डोळ्यांसमोर उभे रहातात; त्यामुळें कांहीं सुचत नाहीं. गुलछबु ह्मणाली, काय असेल तें असो; पण मलाही तुझ्यासारखेच अपशकुन होतात. आणि आज शहाजाद्याच्या दृष्टींतही कावऱ्याबावऱ्यासारखा फरक दिसतो तेव्हां हें आहे तरी काय हें कांहींच समजत नाहीं. अशा रीतीनें कांहीं भवतिनभवति झाल्यावर प्रारब्धावर हवाला ठेवून गुलछबु उठून आपल्या महालीं गेली.

एक दिवस मल्केच्या महालीं व एक दिवस गुलछबूच्या महालीं रात्र क्रमण्याचा शहाजाद्याचा परिपाठ असे; त्याप्रमाणें तो दिवस मल्केचा होता. परंतु त्या दुष्ट प्रधानपुत्रास हे अंतर्नियम माहित नसल्यामुळें त्या दिवशीं तो गुलछबूच्या महालीं गेला. हें वर्तमान मल्केस समजतांच ती गुलछबूच्या महालीं गेली आणि

कृत्रिम शहाजाद्याचें एकंदर वर्तन कांहीं वेळ सूक्ष्म नजरेनें पाहून त्यास ह्मणाली—कां महाराज, आज आपली मर्जी कोणीकडे आराम घ्यावयाची आहे? प्रधानपुत्र गांगरल्यासारखा होऊन ह्मणाला, ज्या ठिकाणीं तूं सांगशील तेथें आराम करीन. हें ऐकून मल्का ह्मणाली, आज तुह्मी येथेंच रहा. असें ह्मणून गुलछब्बूचा हात धरून तिला आपल्या महालीं घेऊन गेली आणि अनेक प्रकारें शोक करूं लागली. तो प्रकार पाहून गुलछब्बूही घाबरून ह्मणाली, जिवलगे, असा शोक कां करितेस त्याचें कारण सांग. मल्का ह्मणाली, आजपासून आपणाला शहाजादा अंतरला. त्याची आतां यावज्जन्म भेट होणें दुरापस्त आहे. आपण पहिल्यानेंच प्रधानपुत्राशीं विशेष सलगी उपयोगाची नाहीं असें सांगितलें असतां तें ऐकलें नाहीं; त्यामुळेंच हा अनर्थ घडला. कसा ह्मणशील तर—माझ्या बापानें शहाजाद्यास परकायाप्रवेशाची विद्या शिकविली होती. ती त्यानें भोळसरपणानें कपटी प्रधानपुत्रास सांगितली असेल; आणि त्यामुळेंच हा अनर्थ ओढवला. कारण, तो स्वरूपानें जरी शहाजाद्यासारखा दिसतो, तरी एकंदर वर्तनावरून तो प्रधानपुत्र असावा असें मलाही

वाटतें. इतकें बोलणें झाल्यावर मल्केनें आपल्या दासींस महालाभोंवतीं पहारा करावयास सांगून शहाजादा किंवा दुसरा कोणीही आला तरी त्यास आंत सोडूं नका अशी सक्त ताकीद केली; आणि दोघीही शोक करीत व आतां अब्रूचा बचाव कसा करावा या विचारांत निमग्न झाल्या.

उजाडल्याबरोबर कृत्रिम शहाजाद्यानें सर्व लोकांस तेथून कुच करण्याचा हुकूम दिला. तेव्हां मल्का व गुलछबु याही मुकाम्यानें स्वारीबरोबर निघाल्या. जातां जातां संध्याकाळच्या सुमारास त्यांस एक शहर लागलें. तें राज्य लहानसेंच असल्यामुळें तेथील राजा शहाजाद्याची ती अफाट सेना पाहून घाबरून जाऊन करभार घेऊन सामोरा आला. कृत्रिम शहाजाद्यानें तो घेण्याचें नाकारून मैत्री केली. तें पाहून तो राजा मोठ्या आनंदानें सर्वांस घेऊन नगरांत आला. आणि आपला किल्ला त्यांस रहावयास दिला. शहाजादा सहपरिवार त्या किल्ल्यांत उतरल्यावर दुसरेच दिवशीं त्यानें अशी दौंडी पिटविली कीं, जो कोणी हरीण धरून आणील त्यास २ रुपये बक्षीस मिळतील. त्या दवंडीप्रमाणें रोज हजारों हरीण लोक धरून आ-

णित. त्यांस शहाजादा स्वहस्तानें ठार मारी. असा बरेच दिवस क्रम चालल्यामुळें सर्व हरीण संपून गेले, तेव्हां त्यांची किंमतही वाढूं लागली. ती इतकी कीं, एका हरिणाबद्दल दोनदोनशें रुपयेही मिळूं लागले. शहाजाद्यानें चालविलेला हा प्रकार ऐकून मल्का व गुलछबु यांनीं असें निश्चित केलें कीं, आपला खरा भ्रतार हरिणाचें रूपांत आहे आणि त्याचा जगांतूनच नाश व्हावा या हेतूनें तो हरीण मारीत आहे. असो. परमेश्वराची मर्जी. त्याची कृपा होईपर्यंत याच दुःखांत कालक्रमण केलें पाहिजे.

इकडे त्याच शहरीं एक फासेपारधी होता. तो नित्य रानांत जाऊन पक्षी धरी; पण त्याजवर त्याचें उपजीवन होत नसे. एके दिवशीं त्याच्या बायकोनें "जो कोणी हरीण धरून आणील त्यास दोनशें रुपये मिळतात" असें ऐकलें. तेव्हां तिनें घरीं येऊन आपल्या नवऱ्यास सांगितलें, तुह्मी नित्य रानातून पक्षी धरून आणतां, पण आह्मांला पोटभर खावयालाही मिळत नाहीं. तर तुह्मी उद्यांपासून हरीण धरून येथील राजास आणून देत जा; ह्मणजे तो पुष्कळ द्रव्य

तुम्हांस देईल व त्यांमुळें आपलें दारिद्रही जाईल. बायकोचें हें भाषण ऐकून पारध्यानें आपल्या नशिबाची परिक्षा पहावयाचा निश्चय केला.

इकडे हरिणवेष धारण केलेला शहाजादा रात्रंदिवस शोक व पश्चात्ताप करित त्या रानांत भटकत होता. त्यानें जेव्हां प्रधानपुत्र हरिणसत्र करीत आहे असें ऐकलें, तेव्हां प्राणाच्या भीतीनें तोही सारा दिवस लपून छपून असे. इकडे नित्याप्रमाणें तो फांसेपारधी रानांत गेला व सारा दिवस हरिणाचा शोध करूं लागला. संध्याकाळच्या सुमारास हरिणरूपी शहाजादा दोन चार दिवस खाण्यास न मिळाल्यामुळें क्षुधेनें व्याकुळ होऊन एका वृक्षाखालीं पडला होता, त्याजवर पारध्याची नजर जाऊन त्यानें चटकन जाऊन त्यास धरिलें; व मोठ्या आनंदानें तो परत घरीं येऊं लागला. कांहीं वेळ गेल्यावर शहाजादा दुःखित मुद्रेनें पारध्यास म्हणाला, अरे, तूं आपल्या माथीं व्यर्थ हरिणवधाचें पातक कां घेतोस? या पापाचा तुला देवापाशीं जबाब द्यावा लागेल. सबब मला दुःखी प्राण्याला सोडून दे म्हणजे तुझें कल्याण होईल. पारधी म्हणाला, या तुझ्या परमार्थाच्या गोष्टी माझ्या उपयोगीं नाहींत.

कारण, घरीं माझीं पोरेंबाळें उपाशीं मरताहेत. तर मी तुला उदईक राजाकडे नेईन आणि तो जें बक्षीस देईल त्यांत मुलाबाळांचें रक्षण करीन. हें ऐकून हरीणरूपी शहाजादा अतिशय शोक करून आपणास सोडून देण्याविषयीं हात जोडून प्रार्थना करूं लागला; परंतु त्यानें जुमानलें नाहीं. पुढें पारधी घरीं आल्यावर स्त्रीस हरीण दाखवून म्हणाला, हा पहा मीं हरीण धरून आणला; आतां तो उद्यां राजास देऊन तो काय देतो तें पाहूं. तें ऐकून स्त्री हरणाजवळ येऊन त्यास कुरवाळूं लागली. शहाजाद्यानें विचार केला कीं, मी आपल्या मुक्ततेकारितां पारध्याची प्रार्थना केली; पण त्यानें ती जुमानली नाहीं; तर आतां याच्या स्त्रीस विनंती करून पहावें. पुरुषापेक्षां स्त्रियांचीं अंतःकरणें स्वभावतःच कोमल असतात; तेव्हां परमेश्वरकृपा असल्यास कदाचित् तिला दया येऊन माझी मुक्तता करील. असा विचार करून तो हरीणरूपी शहाजादा पारध्याच्या स्त्रीस ह्मणाला, हे स्त्रिये, मी अति दुःखी प्राणी असून केवळ दुर्दैवाच्या योगानें अशा दुःखांत सांपडलों आहें. वास्तविक पाहिलें तर लहानपणापासून सुखांत दिवस काढले. पण प्रारब्धाचा खेळ असा विलक्षण आहे

कीं, तें सर्व तुच्छ मानून घर सोडलें व अनेक प्रका-रचीं दुःखें व संकटें भोगीत आज तुझ्या हातीं सांप-डलों. आतां उद्यां मला राजाकडे नेल्यावर तो तु-झाला शेंदोनशें रुपये देईल व त्या योगानें तुह्मी कांहीं दिवसपर्यंत सुख भोगाल. परंतु राजा मला ठार मारील, व ती हत्या विनाकारण तुमच्या माथीं बसून त्या पा-पाबद्दल परमेश्वर तुह्मास शासन करील. दरिद्र हें स-र्वांच्या मागें लागलेलेंच आहे; तथापि जो पापकर्म न करितां केवळ ईश्वरावर भरंवसा ठेवून रहातो, त्याचें परमेश्वर सदोदित कल्याण करतो. तूं यमन देशच्या राजाची जर गोष्ट ऐकशील, तर मी ह्मणतो हें खरें किंवा खोटें याचा निर्णय होईल. हरिणरूपी शहाजा-द्याचें हें भाषण ऐकून पारध्याची स्त्री आश्चर्य व पश्चा-ताप पावून ह्मणाली, हे प्राण्या, यमन देशच्या राजाची गोष्ट कृपा करून मला सांग. हें ऐकून शहाजादा तिला गोष्ट सांगूं लागला.

# प्रकरण ११ वें

## यमन देशाच्या राजाची गोष्ट.

यमन देशांत एक राजा राज्य करीत होता. त्याचा नियम असा असे कीं, जो कोणी जें कांहीं त्याजजवळ मागे त्याची तो इच्छा पूर्ण करी. त्यामुळें त्याचें 'ईश्वरमित्र' असें नांव पडलें होतें. एके दिवशीं एक फकीर राजाकडे येऊन म्हणाला, जर तूं ईश्वराचा मित्र आहेस, तर त्याच्याकरितां मला तीन दिवस पर्यंत तुझें राज्य करूं दे. राजानें ठीक आहे असें म्हणून सर्व कामगार लोकांस त्याच्या आज्ञेंत वागण्याचा हुकूम केला; व आपण राजतक्तावरून उठून निघून गेला. फकिरानें तीन दिवस राज्य चालविल्यावर चौथे दिवशीं राजा आला तेव्हां फकीर म्हणाला, तुझी माझी तीन दिवस राज्य करण्याची बोली खरी; पण मला यांत सुख वाटतें आहे, एवढ्या करितां हें राज्य मला दे. हें त्या फकिराचें भाषण ऐकून राजानें ठीक आहे असें म्हटलें व स्त्रीपुत्रांसह राज्यभोगाचा त्याग करून फकिरी वेष धारण केला आणि

यमन शहर सोडून निघाला. इतके दिवस जसें राज्यभोगाचें सुख घेतलें, तसें फकिरीवृत्तीचें सुख अनुभविलें पाहिजे; असा विचार करीत, व मिळालें तर खाईं, नाहीं तर उपाशींच, अशा स्थितींत मार्ग क्रमीत तो राजा एके दिवशीं एका मुसाफरखान्यांत उतरला. त्या ठिकाणीं एक सौदागर बरेच दिवसापासून उतरला होता. तो यमनच्या राणीचा मुखेंदु पाहून मोह पावला आणि म्हणाला, मातीमध्यें जसें सोनें चमकावें त्याप्रमाणेंच ही स्थिति दिसते. असो. असा विचार करून त्या सौदागरानें राजाजवळ जाऊन सलाम केला. रीतीप्रमाणें राजानेंही उलट सलाम केल्यावर सौदागर म्हणाला, महाराज, येथून थोड्या अंतरावर माझा व्यापाराचा काफला उतरला आहे. त्यांत माझी स्त्री गरोदर असून ह्या वेळीं तिला प्रसूत वेदना होत आहेत. मी दायीचा शोध करण्याकरितां हिंडत आहे, परंतु तपास नाहीं; एवढ्याकारितां मेहरबानी करून जर तुम्ही आपल्या सुशील स्त्रीस पाठवाल, तर मोठे उपकार होतील. सौदागराचें हें भाषण ऐकून राजास दया येऊन तो स्त्रीस म्हणाला, अशा अवस्थेंत हा देह दुसऱ्याचे उपयोगीं पडत आहे हें मोठें भाग्य समजून खुशाल आनंदानें या

सौदागराबरोबर जाऊन त्याचा कार्यभाग उरकून परत ये. राजाची ही आज्ञा ऐकतांच राणी तत्काळ निघाली. तेव्हां काफला दूर असल्यामुळें सौदागरानें तिला घोड्यावर बसविलें व आपण लगाम हातीं धरून काफल्या जवळ आला. नंतर सर्वांस कुच करण्याचा हुकूम करून आपण दुसऱ्या एका घोड्यावर स्वार होऊन राणीसह पुढील मार्ग क्रमूं लागला. हा प्रकार पाहून राणी अतिशय शोक करूं लागली; परंतु तिकडे लक्ष न देतां ती सर्व मंडळी एकसारखी जलद चालली होती.

इकडे राजा रात्रभर वाट पहातां पहातां दमला, व उजाडतांच मुलांस बरोबर घेऊन काफला उतरला होता तेथें गेला; परंतु तेथें कोणीही नसल्यामुळें कांहींच शोध लागेना. तेव्हां दगा करून सौदागर आपल्या स्त्रीस घेऊन गेला, असा निश्चय करून ज्या रस्त्यानें काफला गेला त्या रस्त्यानें जाऊं लागला. राजास चालण्याची बिलकूल शक्ति नव्हती तरी स्त्री-मोहाकरितां तो तसाच दुःख करीत मुलांसह निघाला. काफला पुढें व राजा मागें अशा रीतीनें जातां जातां मार्ग चुकून भलत्याच रस्त्यानें जाऊं लागला असतां

एके दिवशीं एक नदी लागली. त्या नदीस पाणी बरेंच होतें तथापि नाव किंवा मनुष्य कोणीही नसल्या-मुळें राजानें एका मुलास किनाऱ्यावर बसविलें आणि दुसऱ्यास बरोबर घेऊन नदी उतरूं लागला. अर्ध्या नदींत राजा गेला तों इकडे एक आस्वल आलें आणि मुलास उचलून घेऊन गेलें. हें पाहून राजा घाबरला, तों हातांतील मुलगेंही नदींत पडून नाहींसें झालें. स्त्री सौदागरानें नेली, दोन्ही मुलें अशा रीतीनें नाहींशीं झालीं यांबद्दल राजास अतिशय वाईट वाटून त्यानें परमेश्वराची प्रार्थना केली व पुढें मार्ग क्रमूं लागला. जातां जातां त्यास एक नगर लागलें. तेथें अशी चाल होती कीं, राजा मेला असतां सर्व प्रजेनें एकत्र जमून एक मैना उडवावी; व ती ज्याच्या डोक्यावर बसेल त्यास राज्यपदावर बस-वावें. ज्या दिवशीं यमनचा राजा त्या शहरीं आला त्या दिवशीं तेथील राजा वारल्यामुळें नव्या राजाचे स्थापना करण्याकरितां सर्व प्रजा नगराबाहेर एकत्र जमली होती. तेथें यमनचा राजा येतांच त्याच्या डोक्यावर ती नगरवासी लोकांनीं सोडलेली मैना बसली हें पाहून प्रधानादि मुत्सद्दी मंडळानें त्यास तेथील राज्या

भिषेक केला. यमनच्या राजास पुन्हां जरी राज्य-सुख मिळूं लागलें, तरी दोन मुलें व स्त्री नाहींशीं झाल्यामुळें तो सदां उदास असे; तथापि प्रजेच्या कल्याणाकडे व राज्यव्यवस्थेकडे तो चांगलें लक्ष पुरवी; त्यामुळें त्याची सर्व लोक वाखाणणी करीत.

इकडे राजाच्या वडील मुलास अस्वल घेऊन जात असतां एका शिकाऱ्यानें अस्वलास मारून तें मूल घरीं आणिलें. व दुसरा जो मुलगा राजा बावरल्यामुळें नदींत पडला, तो वहात वहात जात असतां एका कोळ्याच्या जाळ्यांत सांपडला. तेव्हां त्या कोळ्यानें तें सुस्वरूप पुत्ररत्न पाहून मोठ्या प्रेमानें त्याचें पालन केलें. इकडे राजा दिवसेंदिवस पुत्रशोकानें जास्त विव्हळ होत चालल्यामुळें त्यानें प्रधानास दोन मुलें घेऊन येण्यास सांगितलें. त्याप्रमाणें प्रधाना-नें साऱ्या नगरांतील मुलें एकत्र जमा केलीं. अस्वला-पासून राजपुत्रास सोडविणारा शिकारी व तो कोळी असे दोघेही त्याच नगरांतील रहिवाशी असल्यामुळें त्या जमा केलेल्या मुलांत हे राजाचे दोन्ही मुलगे आलेच होते. त्यांचें एकंदर सुलक्षण पाहून प्रधानानें सर्व मुलांतून त्यांसच निवडून राजास आणून दिलें. वा-

स्तविक ते जरी राजपुत्र होते, तरी बरेच दिवस नाहींसे झाल्यामुळें राजानें ओळखिले नाहींत. तथापि त्यांचा मुखेंदु पहातांच राजाच्या मनांत प्रेम उत्पन्न होऊन त्यानें त्यांस विद्या वगैरे शिकवून मोठे अधिकार दिले.

ज्यानें राजाची बायको पळवून नेली होती तो सौदागरही त्याच नगरचा रहाणारा असल्यामुळें कांहीं दिवसांनीं तेथें आला. त्याची व पूर्वीच्या राजाची अतिशय मैत्री होती, परंतु तो वारल्याचें वर्तमान ऐकून त्यास फारच दुःख झालें. तथापि नवा राजा पहिल्यापेक्षां फारच लोकप्रिय आहे असें समजल्यावरून तो त्याच्या भेटीस गेला; परंतु उभयतांनींही एकमेकांस ओळखलें नाहीं. या नंतर त्या दोघांची मैत्री दिवसेंदिवस जास्त वाढत चालली. एके दिवशीं तो सौदागर राजाच्या भेटीस आला असतां राजानें त्यास आज येथेंच रहा असें सांगितलें, तें ऐकून सौदागराचें मन उदास झालें. हें पाहून राजानें त्याचें कारण विचारलें. सौदागर ह्मणाला, मजजवळ एक स्त्री असून ती नेहमीं उदास असल्यामुळें केव्हां पळून जाईल याचा नेम नाहीं; सबब तिच्या बंदोबस्ताकरितां मला घरीं गेलें पाहिजे. राजा ह्मणाला, त्याचा बंदो-

बस्त मी करितों. असें ह्मणून त्यानें पुत्राप्रमाणें पालन-पोषण केलेल्या दोघां मुलांस कांहीं निवडक लोक बरोबर देऊन सौदागराच्या घरीं बंदोबस्ताकरितां पाठविलें.

आज्ञेप्रमाणें ते दोघेही मुलगे सौदागराच्या घरीं पहारा करीत असतां मध्य रात्रीच्या सुमारास दोघांसही झोंप येऊं लागली. तेव्हां कांहीं तरी गोष्टी सांगून रात्र घालवावी असा विचार करून मोठा मुलगा ह्मणाला, तूं एखादी गोष्ट सांग ह्मणजे आपली झोंप उडून जाईल. धाकटा ह्मणाला, माझ्या स्वताची जर तूं गोष्ट ऐकशील, तर झोंपशी काय पण कितीएक दिवसपर्यंत तुझी भूक व तहान हरून जाईल. इतकी ती हृदयद्रावक आहे. असें बोलून तो म्हणाला, मी यमन देशाच्या राजाचा मुलगा आहे. माझा बाप आपलें सर्व राज्य परमेश्वराच्या नांवानें एका फकिरास देऊन मला, तुझ्यासारखाच माझा एक वडील भाऊ होता त्यास व आमच्या आईस घेऊन नगर सोडून निघाला. मार्गांत एक सौदागर भेटला तो लबाडीनें आमच्या आईस घेऊन गेला, तेव्हां माझा बाप आम्हां दोघां भावांस घेऊन मार्ग क्रमीत असतां एक नदी लागली. त्या नदीवर नाव वगैरे नसल्यामुळें

थोरल्या भावास किनाऱ्यावर ठेवून मला खांद्यावर घेऊन नदी उतरत असतां एक आस्वल चटकन येऊन किनाऱ्यावर असलेल्या थोरल्या भावास घेऊन गेलें. त्याबरोबर बाप अतिशय घाबरल्यामुळें मी नदींत पडून वाहत चाललों. परंतु कर्मधर्मसंयोगानें थोड्याच वेळांत एका कोळ्याच्या जाळ्यांत सांपडल्यामुळें त्यानें बाहेर काढून माझें पुत्राप्रमाणें प्रेमानें संगोपन केलें. हें त्याचें भाषण ऐकतांच वडील भावानें त्यास कडकडून मिठी मारली; आणि ह्मणाला, आस्वलानें नेलेला तुझा भाऊ तो मीच; असें ह्मणून त्यानें शिकाऱ्याची सर्व हकीगत सांगितली. इतक्यांत असा चमत्कार झाला कीं, ज्या ठिकाणीं हे गोष्टी बोलत बसले होते, त्याच्या नजीकच सौदागरानें पळवून आणलेल्या त्यांच्या आई-ची खोली होती. ती हें उभयतांचें बोलणें ऐकून पुत्रप्रेमानें चटकन दार उघडून धांवतच आली; आणि दोघां मुलांस पोटाशीं धरून शोक करूं लागली. नंतर सौदागरानें केलेल्या जाचाची वगैरे सर्व हकीगत तिनें मुलांस सांगितली, तोंच हें वर्तमान राजास समजलें. राजानें त्या सर्वांस बोलावून आणलें तेव्हां सर्वांच्याही ओळखी पटून सर्वत्र आनंदीआनंद झाला. व सौदागरास

त्याच्या या महत् पापकृत्याबद्दल राजानें योग्य शासन केलें. पुढें थोड्याच दिवसांत ही खबर यमन देशांत कळल्यावर तेथील प्रधानानें त्या फकीर राजास त्याच्या दुर्वर्त्तनास्तव विषप्रयोगानें मारून टाकलें; व राजास मोठ्या समारंभानें आणून गादीवर बसविलें.

इतकी गोष्ट सांगून हरीणरूपी शहाजादा ह्मणाला, पहा, त्या राजानें परमेश्वरास स्मरलें ह्मणून त्यास दोन राज्यें मिळालीं. व फकिरानें लोभ धरिला ह्मणून त्यास देहांतशासन मिळालें. याकरितां तूं परमेश्वरास भिऊन थोडक्या लाभाकरितां माझ्या हत्येचें पातक माथीं घेऊं नकोस; ह्मणजे परमेश्वर तुझें कल्याण करील. हें ऐकून त्या पारध्याच्या स्त्रिचें चित्त द्रवून ती ह्मणाली, हे शहाण्या हरिणा, तुझें मी पुत्राप्रमाणें संरक्षण करीन; त्याविषयीं तूं बिलकूल काळजी करूं नकोस. असें ह्मणून ती त्यास खावयास घालून व प्रेमानें कुरवाळून निजावयास गेली; व हरीणरूपी शहाजादाही परमेश्वरचिंतन करीत स्वस्थ पडून राहिला.

दुसरे दिवशीं सकाळीं फांसेपारधी हरीणरूपी शहाजाद्यास घेऊन राजाकडे जाऊं लागला. तेव्हां स्त्री ह्मणाली, आजचा दिवस तुह्मी रानांत जाऊन

आपलें नशीब पारखा व मग उद्यां याला राजाकडे न्या. स्त्रिचें हें भापण ऐकून पारधी रानांत गेला, तों दैवयोगानें एक पक्ष्यांचा थवाच त्याच्या जाळ्यांत सांपडला. मग मोठ्या आनंदानें त्यानें तीं पांखरें पकडून बाजारांत आणून विकलीं; तेव्हां रोजच्या पेक्षां जास्त कमाई झाली. ह्मणून मोठ्या उल्हासानें शिधा सामान घेऊन नाचत बागडत तो आपल्या घरीं आला. नंतर त्यानें तें आनंददायक वर्तमान स्त्रीस सांगितलें. तें ऐकून ती ह्मणाली--काल जो तुह्मी हरीण धरून आणलांत तो मोठा चतुर व दैवशाली आहे. तो जोंपर्यंत आपल्या घरीं असेल, तोंपर्यंत आपणास कोणत्याही प्रकारची ददात पडणार नाहीं; तरी तुह्मी त्यास राजाकडे नेण्याच्या भरीस पडूं नका. स्त्रिचें हें भापण ऐकून पारध्यानें ठीक आहे असें ह्मटलें. या नंतर ती पारध्याची स्त्री हरीणरूपी शहाजाद्याचें बहुत दिवसपर्यंत मुलाप्रमाणें पालन करीत असतां, एके दिवशीं एक सौदागर त्या पारध्याच्या घरीं पांखरें खरेदी करण्याकारितां आला. तो ह्या हरीणरूपी शहाजाद्याचें शहाणपण वगैरे पाहून मोठा आनंदित झाला व असा प्राणी आपण बाळगावा असा शोक त्याच्या

मनांत उमजून तो पारध्यास म्हणाला, हा हरीण जर तुह्मी मला द्याल तर याची सांगाल ती किंमत मी देईन. याला नेहमीं आपल्याजवळ पाळावें असी माझी फार इच्छा आहे. पारधी व त्याची स्त्री ह्मणाली, आह्मी याची पोटच्या पोरासारखी जतन केली आहे, तेव्हां आमच्यानें तो कधींही देववणार नाहीं. हें निग्रहाचें उत्तर ऐकून पारधी ह्मणाला, तर मग तुमच्या घरीं हरीण असून आजपर्यंत तो तुह्मी राजास दिला नाहीं हें मी सरकारांत कळवीन; मग तुह्मी काय कराल? हें त्यांचें भापण हरीणरूपी शहाजादा ऐकत असल्या-मुळें तो मनाशीं ह्मणाला, हा सौदागर, आपणास प्रेमानें पाळण्याकरितां मागत असून याचा सहवास केल्यानें कदाचित या योनींतून आपली सुटकाही करून घेतां येईल. आणि जर मी या पारध्याच्याच घरीं राहिलों, तर आपली सुटकेची संधी येण्याचा संभव नाहीं. तेव्हां पारध्याचे स्त्रियेचें मन वळवून सौदागराची संगती धरिली असतां आपला फायदा होईल असें वाटतें, असा विचार करून तो पारध्याच्या स्त्रीस म्हणाला, आतां जर तुम्ही माझा लोभ कराल तर हा सौदागर हें वर्तमान राजास जाऊन सांगेल

व तो मला धरून नेऊन तुह्मालाही शिक्षा करील. तेव्हां व्यर्थ आपल्यावर संकट न येतां हा सौदागर जर माझें पालन करण्याकरितांच मागत आहे, तर तुह्मी मला मोठ्या आनंदानें त्याच्या स्वाधीन करा. नाहीं तर उद्यांच माझा प्राण जाईल. हरीणरूपी शहाजाद्याचें हें बोलणें पारध्याच्या स्त्रीस रुचून तिनें हरिणास पोटाशीं धरून कुरवाळलें व मोठ्या संकटानें सौदागराच्या स्वाधीन करून काळजीनें संरक्षण करण्याविषयीं वजावून मागितलें. सौदागरही मोठा आनंदित होऊन त्यानें खुषीनें पांचशें रुपये फीमिपारध्यास देऊन संतुष्ट केलें व हरिणास घेऊन घरीं गेला.

सौदागर स्वभावाचा दिलदार असल्यामुळें हरीणरूपी शहाजादा अनेक प्रकारच्या गोष्टी सांगून त्याचें मन संतुष्ट करी. त्यामुळें सौदागराचा त्याजवर इतका लोभ जडला कीं, तो एक क्षणही त्यास विभिन्नत नसे; व इष्टमित्र त्याचे घरीं येत, त्यांजवळ तो हरिणाच्या शहाणपणाची मोठी तारीफ करी. या कारणानें थोडक्याच दिवसांत ती बातमी सर्व शहरभर पसरून राजाच्या कानावर गेली. तेव्हां हाच हरीणरूपी शहाजादा असावा असा तर्क करून याला मारून

टाकलें असतां आपला उद्देश पूर्ण सिद्धीस जाईल अशा समजुतीनें त्यानें सौदागरास हरीण घेऊन दरबारीं बोलाविलें राजा हरिणाचें काय करणार हें माहीत असल्यामुळें त्यानें उलट निरोप पाठविला कीं, तो हरीण लहानपणापासून बाळगलेला असल्या कारणानें मी त्यास आपला जीव कीं प्राण समजतों; येव-ढ्या करितां सरकारास माझ्यानें तो देववणार नाहीं. हा निरोप ऐकून राजाच्या तळची आग मस्तकीं जाऊन त्यानें सौदागरास हरीणासह पकडून आणण्याचा हुकूम केला. आज्ञेप्रमाणें शिपायांनीं राजाज्ञा सौदागरास कळविली तेव्हां त्यास परमावधीचें दुःख झालें. परंतु हरीणरूपी शहाजाद्यानें त्याची समजूत करून सांगि-तलें कीं, प्रत्येक प्राण्यास मरणें हें आहेच. आज जरी राजाच्या हातून मला मरण आलें नाहीं, तरी केव्हां तरी मी मरणारच. असें असतां व्यर्थ तूं राजा-ज्ञा मोडून राजदंडास कां पात्र होतोस? मला खुशाल राजाकडे घेऊन चल; मग जें काय होणें असेल तें होईल. हरिणाचें हें भाषण ऐकून तो सौदागर निरु-पायास्तव हरीणास घेऊन निघाला.

इकडे मलका शहाजादीला सौदागराजवळ असलेल्या

हरिणाची एकंदर हकीगत समजली असल्यामुळें तिनें जाणलें कीं, बहुधा हाच शहाजादा असावा. परंतु त्यास दरबारीं आणण्याची राजाज्ञा झाली असल्यामुळें आतां तो दुष्ट नराधम प्रधानपुत्र त्यास ठार मारील व मग यावतजन्म त्याची आपली भेट होणार नाहीं ह्याचें तिला अतिशय दुःख झालें. इतक्यांत तो सौदागर हरीणरूपी शहाजाद्यासह हत्तीच्या अंबारींत बसून मल्केच्याच महालावरून राजदरबारीं जात होता, त्यास पाहून मल्केस मोठा आनंद झाला व तिनें आपल्या नोकरांकडून सौदागरास हरीणासह महालीं बोलावून आणविलें. त्याप्रमाणें सौदागर आल्यावर मल्का म्हणाली, तुम्हा जवळ फारच शहाणा व चतुर हरीण आहे असें मीं ऐकलें, तेव्हांपासून एक वेळ त्या हरिणास पहावें अशी मला फार इच्छा झाली होती; ती आज ईश्वरकृपेनें पूर्ण झाली. तथापि थोडक्याच वेळानें राजा यास यमसदनीं पाठविणार याबद्दल मात्र वाईट वाटतें. मल्केचें हें भाषण ऐकून हरीणरूपी शहाजादा म्हणाला, मी मरणाची बिलकूल पर्वा करीत नाहीं. कारण पहिल्यानें मींच होऊन जर आपल्या पायावर कुऱ्हाड मारून घेतली तर आतां

त्याबद्दलचें दुःख करण्यांत काय अर्थ! असें म्हणून त्यानें मल्केकडे पाहून डोळ्यावाटें पाणी काढलें. हें पाहून हाच शहाजादा असावा असा तिच्या मनाचा पक्का निश्चय होऊन ती म्हणाली, तर मग आतां आपल्या जिवास विनाकारण कां कष्ट देतोस! असें म्हणून तिनें कोणास न समजूं देतां आपल्या पोपटाची मान मुरगळली, तेव्हां परकायाप्रवेशविद्येनें शहाजाद्यानें चम्कन हरिणाचें शरीर टाकून पोपटाच्या देहांत प्रवेश केला त्याबरोबर हरिणाचें प्रेत होऊन पोपट जिवंत झाला. हा प्रकार पाहून सौदागर अतिशय शोक करूं लागला. परंतु मल्केनें हा ईश्वरी नियम आहे त्यापुढें कोणाचा इलाज नाहीं वगैरे त्याची समजूत केली. इकडे राजास हें वर्तमान समजतांच त्यानें तें हरिणाचें प्रेत आणवून आपल्यासमक्ष जाळून टाकलें; व सौदागरास घरीं जाण्याची आज्ञा दिली.

प्रधानपुत्र दगलबाजीनें शहाजादा बनल्यानंतर जरी नित्य मल्केच्या व गुलछबूच्या महालीं जाई, तरी त्या त्याचें कपट जाणून बिलकूल भाषण करीत नसत; त्यामुळें प्रधानपुत्र नेहमीं उदास असे. परंतु

खरा शहाजादा मल्केच्या हस्तगत होतांच तिनें त्यास महालीं येऊन जाण्याचा निरोप पाठविला. त्याप्रमाणें प्रधानपुत्र मोठ्या आनंदानें मल्केच्या महालीं आल्यावर ती ह्मणाली, मला आतांशीं चैन पडत नाहीं; यास्तव एखादें गोजिरवाणें कोंकरूं करमणुकीकारितां पाठवून द्या. मल्केच्या तोंडचे हे शब्द ह्मणजे केवळ मौक्तिकेंच असें समजून त्यानें मोठ्या आनंदानें एक लहानसें कोंकरूं तिच्या महालीं पाठवून दिलें. यानंतर जेव्हां जेव्हां कपटी प्रधानपुत्र तिच्या महालीं येई, त्या त्या वेळीं ती त्याच्याशीं बाह्यात्कारें प्रेमानें वोले; त्यामुळें त्यास अत्यानंद होऊन थोडक्याच दिवसांत ही आपल्या पूर्ण ताब्यांत येईल अशा मनोराज्यांत तो गढून गेला होता. इकडे मल्केनें शहाजादा हस्तगत झाल्यापासून पुढें काय काय करावयाचें हें सर्व गुलछबूस सांगून ठेविलें होतें. त्यामुळें तीही थोडक्याच दिवसांत शहाजाद्याची व आपली भेट होईल या आशेनें मल्केप्रमाणेंच कपटी प्रधानपुत्रास बाह्यात्कारें प्रेम दाखवूं लागली. असें होतां होतां एके दिवशीं मल्केनें जें कोंकरूं पाळलें होतें, त्यास अर्ध मेलें केलें आणि एका नोकराबरोबर प्रधानपुत्रास तावडतोब महालीं येण्याचा निरोप पाठ-

विला; आणि पोपटरूपी शहाजाद्याचा पिंजरा उघडा करून पलंगासमोर एका खुंटीवर टांगून ठेवून प्रधानपुत्र येतांच कोंकराची मान घट्ट दावून तिनें त्याचा प्राण घेतला; व मोठा आक्रोश करण्यास सुरवात केली. तो प्रकार पाहून प्रधानपुत्र घाबरून तिची समजूत करूं लागला; परंतु ती ह्मणाली, माझें हें लाडकें कोंकरूं अकस्मात मरण पावलें आहे त्यास पुन्हां जिवंत पाहिल्या शिवाय माझें दुःख कमी होणार नाहीं. हें ऐकून प्रधानपुत्र ह्मणाला, मेलेला प्राणी जिवंत कसा होईल? ती ईश्वराची माया, त्या पुढें कोणाचा इलाज नाहीं. मल्का ह्मणाली, असें कां ह्मणतां? मागें एक वेळ माझें मेलेलें कोंकरूं तुम्हीच पलंगावर निजून दोन घटकापर्यंत जिवंत करून दिलें होतें, तें मी विसरलें नाहीं. हें ऐकून प्रधानपुत्रानें विचार केला कीं, शहाजाद्यास परकायाप्रवेशाची विद्या अवगत असल्यामुळें त्यानें कदाचित् असें केलें असेल, तेव्हां आपल्याला नाहीं ह्मणून उपयोग नाहीं. असा विचार करून प्रधानपुत्र पलंगावर निजला आणि आपला जीव परकायाप्रवेशक्रियेनें कोंकराच्या शरिरांत घातला; त्याबरोबर तें कोंकरूं उठून बागडूं लागलें. ही संधी पाहून पोपट-

रूपी शहाजाद्यानें तत्काळ पोपटदेहाचा त्याग करून आपल्या खऱ्या शरिरांत प्रवेश केला. हें पाहून मल्केचा आनंद त्रिभुवनांत मावेनासा होऊन तिनें थोडेसे तांदूळ मंत्रवून प्रधानपुत्रास पुन्हा परकायाप्रवेश करतां येऊं नये ह्मणून कोंकरावर टाकले आणि शहाजाद्यास दृढालिंगन दिलें. इतक्यांत हें शुभ वर्तमान दासींनीं जाऊन गुलछबूस सांगितलें; त्याबरोबर तीही धांवतच आली आणि मल्केचे उपकार मानून शहाजाद्याच्या गळ्यास घट्ट मिठी मारून शोक करूं लागली. तेव्हां शहाजाद्यानें तिची समजूत करून प्रधानपुत्राचें सर्व कपट व हरीणरूप पावल्यापासूनची एकंदर हकीगत त्यांस सांगितली. मात्र मित्रद्रोही प्रधानपुत्र आतां जन्मभर आपणास याच स्थितींत रहावें लागणार व पुढें आपले अतिशय हाल होणार ह्मणून शोक करूं लागला.

नंतर शहाजाद्यानें फांसे पारध्यास व सौदागरास बोलावून आणून आपली एकंदर हकीगत सांगितली आणि पुष्कळ मौल्यवान जवाहीर बक्षीस देऊन त्यांस सुखी केलें.